शांतिलाल मुथ्था फाउंडेशन



# मूल्यवर्धन

## ३.० आवृत्ती

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२३ व
राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४ यांच्याशी सुसंगत मूल्यशिक्षण

**संकल्पनात्मक आराखडा**

## या दस्तावेजाविषयी

या दस्तावेजात शांतिलाल मुथ्था फाऊंडेशन (SMF) या संस्थेने संपूर्ण भारतातील शाळांसाठी विकसित केलेल्या मूल्यवर्धन या शालेय मूल्यशिक्षण उपक्रमाच्या अद्ययावत आवृत्तीचा संकल्पनात्मक आराखडा सादर केला आहे. प्रस्तुत मूल्यवर्धन आवृत्ती राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ (NCF 2023) व महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम आराखडा, २०२४ (SCF 2024) या दस्तावेजांशी सुसंगत आहे.

## शांतिलाल मुथ्था फाऊंडेशन (SMF) विषयी

वैयक्तिक आणि सामाजिक कल्याणासाठी, मुलांना, आपल्या क्षमतांचा पुरेपूर उपयोग करणारे संवेदनशील, जबाबदार आणि उत्पादक नागरिक घडविणे, हा शालेय शिक्षणाचा एक प्राथमिक उद्देश आहे. हे स्वप्न साकार करणे हे शांतिलाल मुथ्था फाऊंडेशन या संस्थेचे एक प्रमुख ध्येय आहे. असे घडण्यासाठी, शाळांमध्ये नेहमी आनंद देणारे आणि मानवी विविधतेला सामावून घेणारे समावेशक वातावरण राखणे गरजेचे आहे. अशा वातावरणातच शाळेतील मुले तसेच शिक्षक, कर्मचारीवर्ग, पालक या सर्वांवर सखोल आणि विधायक ठसा उमटवू शकतील, असे मूल्याधारित शैक्षणिक संस्कार करणे आणि योग्य अध्ययन अनुभव देणे शक्य होईल.

शाळांच्या माध्यमातून असे नागरिक घडविण्याचे हे ध्येय साकार करण्यासाठी, फाऊंडेशन शालेय शैक्षणिक धोरणे आणि संस्था, शिक्षणाविषयीचे जागतिक संशोधन तसेच शाळा आणि शालेय यंत्रणांमधील उपलब्ध मनुष्यबळ व विविध तांत्रिक संसाधने यांचा प्रभावीपणे लाभदायक रीतीने वापर करते.

**© शांतिलाल मुथ्था फाऊंडेशन**

**प्रकाशन** : शांतिलाल मुथ्था फाऊंडेशन
अंतर्गत वितरणासाठी

**आवृत्ती** : जुलै २०२५

# अनुक्रमणिका

१. मूल्यशिक्षणाची गरज ................. ०१

२. मूल्यवर्धनची प्रमुख वैशिष्ट्ये .......... ०५

३. शैक्षणिक साहित्य...................... १४

४. सहाय्यक परिसंस्थेची उभारणी ...... १८

परिभाषा सूची........................ २३

परिशिष्ट .............................. २५

# १ मूल्यशिक्षणाची गरज

शालेय शिक्षणाचे अंतिम ध्येय हे नेहमीच करूणा, जबाबदारी आणि शांतता अशा शाश्वत मूल्यांवर आधारित राहिले आहे. कितीतरी संशोधन अभ्यास हेच दाखवून देतात, की काळजी, विश्वास आणि आदर या मूल्यांवर आधारित नातेसंबंध आणि शाळेतील पोषक मानसिक–सामाजिक वातावरण या बाबी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशात कळीची भूमिका बजावतात. त्यामुळेच मूल्यांवर सुस्पष्टपणे भर देणारे शिक्षण व गुणवत्तापूर्ण अध्यापन यांचे नाते जुळल्याने परस्परांना वेढत आणि आधार देत बहरणाऱ्या वेलींसारखेच (‘डबल हेलिक्स’सारखे) असते.[१]

मूल्यांवर आधारित असणाऱ्या शिक्षणाचे मध्यवर्ती स्थान राष्ट्रीय शिक्षण धोरण, २०२० (NEP 2020) या धोरणाने अधोरेखित केले आहे. या धोरणानुसार प्रत्येक विद्यार्थी एक विवेकशील विचार आणि वर्तन असणारा, व्यक्तिमत्वात करुणा, सहानुभूती, धैर्य, जिज्ञासा, वैज्ञानिक दृष्टिकोन, नैतिकता आणि सर्जनशीलता या गुणांचा वास असणारा चांगला माणूस घडविणे हे शिक्षणाचे ध्येय आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण, २०२० मध्ये देखील शाळांमधून उद्यमी/उद्योगी/कार्यरत, उत्पादक असणारे तसेच संविधानात म्हटल्याप्रमाणे समतावादी, समावेशक व बहुविध समाजाच्या निर्मितीसाठी सामाजिक योगदानाची अपेक्षा पूर्ण करणारे नागरिक घडवावेत असे उद्दिष्ट शाळांना सुस्पष्टपणे देण्यात आले आहे.

## मूल्यशिक्षणाची गरज अधोरेखित करणारी सामाजिक कारणे

भारतामधील एका व्यापक सर्वेक्षणात असे दिसून आले आहे, की सध्याच्या युवापिढीचे जीवन हिंसाचार, भेदभाव आणि पूर्वग्रह यांनी लक्षणीय प्रमाणात ग्रासले आहे. आपले वडील आईला मारहाण करतानाचे दृश्य अनुभवल्याचे जवळपास एक–चतुर्थांश युवक, युवतींनी सांगितले. अनेकांनी किशोरवयात पालकांकडून आपल्याला मारहाण झाल्याचेही सांगितले. सुमारे ३७% तरुणांनी आणि ४९% तरुणींनी ते इतर धर्म वा जातीतल्या व्यक्तींबरोबर मोकळेपणाने मिसळत नसल्याचे सांगितले.[२]

जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) अहवालानुसार, मानसिक आरोग्याच्या निम्म्याहून अधिक समस्या वयाच्या १४ व्या वर्षांपूर्वीच सुरू होतात. आत्महत्या हे किशोरवयीन मुलांच्या मृत्युच्या तीन प्रमुख कारणांपैकी एक कारण असल्याचे आढळले आहे.[३] UNICEF या आंतरराष्ट्रीय संघटनेनेही मानसिक आरोग्याचा युवकांच्या आयुर्मान, वाढ आणि विकासावर होणारा विपरीत परिणाम अधोरेखित केला आहे.[४]

सामाजिक माध्यमे व डिजिटल तंत्रज्ञान यांच्या वाढत्या प्रसारामुळे मुलांना सायबर गुन्हेगारी, सायबर ससेमिरा, व्यक्तिगत गोपनीय संवेदनशील माहितीची चोरी आणि इंटरनेटचे व्यसन, अशा धोक्यांना सामोरे जावे लागत आहे.[५]

---

1. Lovat, Terence & Ron Toomey, 2009, Values education and quality teaching: The double helix effect. DOI: 10.1007/978-1-4020-9962-5.
2. Youth in India, situation and needs 2006-07, IIPS, Mumbai
3. “World Health Organization’s World Mental Health Survey Initiative.” World Psychiatry 2007, 6: 168–76.
4. Adolescent Mental Health Matters, 2020, UNICEF
5. Child Rights and You (CRY), “Online Safety and Internet Addiction (A Study Conducted Amongst Adolescents in Delhi-NCR)”, 2020, New Delhi

माध्यमांमध्ये वारंवार प्रसिद्ध होणाऱ्या घटनांतून असे दिसते, की अनेक कोवळ्या वयातील मुलेही सहजतेने हिंसेच्या मार्गाकडे वळत आहेत. नागरी आणि सामाजिक जबाबदाऱ्यांच्या बाबतीत मुलांची उदासीनता आणि निष्क्रियता पाहून शिक्षक, पालक आणि शिक्षणक्षेत्रातील व्यक्ती चिंतित आहेत. या विशिष्ट सामाजिक कारणांबरोबरच आंतरराष्ट्रीय पातळीवरील संघर्ष, जागतिकीकरणाचे दडपण, हवामान बदलाचे दुष्परिणाम आणि इतरही अनेक आव्हानांनी ग्रासलेल्या या जगात, शाश्वत विकास साधण्याची हमी हवी असेल, तर मूल्यशिक्षण ही सर्वात महत्त्वाची जागतिक गरज आणि आशेचा किरण असल्याचे स्पष्ट होत आहे.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२३ (NCF 2023) हा दस्तावेज मूल्यशिक्षणाचे प्राधान्य अधोरेखित करतो. शिक्षणाच्या उद्दिष्ट प्राप्तीसाठी 'मूल्ये व वृत्तींचा विकास हा अत्यावश्यक आहे.' असे स्पष्टपणे नमूद करतो. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ या पुढे जाऊन असेही स्पष्ट केले आहे, की शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरांवरील आशय आणि प्रक्रिया या विद्यार्थ्यांमध्ये NEP 2020 मध्ये नमूद केलेली मूल्ये व वृत्तींच्या विकासाचे उद्दिष्ट साध्य करणाऱ्या असायला हव्यात (NCF, पृ. १५९).

## मूल्यवर्धनची गरज व भूमिका

मूल्ये ही अभ्यासक्रमामध्ये, अध्ययन–अध्यापन पद्धती आणि पाठ्यपुस्तकातील आशयात गुंफलेली असतात. शालेय परिपाठातून मूल्यांविषयी संवाद साधून काही ना काही मूल्यसंस्कार करण्याचे प्रयत्न अनेक शाळा करतच असतात. तथापि, शिक्षणामधील मूल्यांचे मध्यवर्ती स्थान आणि वर स्पष्ट केलेली निकड लक्षात घेता, विद्यार्थ्यांनी जागतिक मंचावर लोकशाहीवादी नागरिक म्हणून भूमिका बजावावी असे वाटत असेल, तर त्यांच्यात या भूमिकेला अनुसरून मूल्ये, वृत्ती आणि क्षमता यांचा परिपोष होणे गरजेचे आहे. या दृष्टीने विद्यार्थ्यांना साहाय्य करण्यासाठी, सुनियोजित व सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज आहे.

या गरजेची पूर्ती करण्यासाठी शांतिलाल मुथ्था फाऊंडेशनमध्ये मूल्यवर्धन संकल्पनेचा उदय झाला. प्रदीर्घ प्रायोगिक प्रयत्नांच्या वाटचालीतून ही एक दृढ संकल्पना असलेली आणि वास्तव अनुभवांशी घट्ट नाळ जोडलेली मूल्यशिक्षण योजना म्हणून विकसित झाली. मूल्यवर्धनचे स्वरूप असे आहे की हा कार्यक्रम भारतातील कोणत्याही राज्यातील कोणत्याही शाळा किंवा शालेय व्यवस्थेमार्फत अंगिकारता येईल असा आहे; याची कारणे अशी आहेत :

- मूल्यवर्धन भारतीय संविधानाच्या उद्देशिकेतील, प्रांत, लिंग, धर्म, वर्ग, जात किंवा विशिष्ट शाळा या आधारे कोणताही भेदभाव न करणाऱ्या मूल्यांच्या खंबीर पायावर आधारित आहे.
- शिक्षणहक्क कायदा, २००९ मध्ये नमूद केलेल्या शालेय प्रक्रिया व शालेय वातावरणविषयक आदेशांशी मूल्यवर्धन सुसंगत आहे.
- या आराखड्याच्या निर्मितीमागे फाऊंडेशनचा मूल्यशिक्षण क्षेत्रातील एका दशकाहूनही अधिक अनुभव आहे.
- याशिवाय, मूल्यवर्धनची सध्याची आवृत्ती, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ मध्ये आणि महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम आराखडा,२०२४ मध्ये शिफारस केलेल्या अध्यापन पद्धती, अभ्यासक्रम उद्दिष्टे आणि मूल्यशिक्षण विषयक दृष्टिकोनाशी सुसंगत आहे.

## मूल्यवर्धनचे विकसन

मूल्यवर्धनचे विकसन पुढील चार टप्प्यांमधून झाले आहे:

### टप्पा १: शालेय शिक्षण क्षेत्राशी समरसता (२००२–२००८)

भारतीय जैन संघटना (BJS) या शांतिलाल मुथ्था फाऊंडेशनच्या मातृसंस्थेने देशभरातील ४३०० पेक्षा अधिक शाळांमध्ये शालेय गुणवत्ता विकसन कार्यक्रमांचे आयोजन केले. या अनुभवातून एक महत्त्वाचा बोध असा मिळाला की, जरी मूल्यशिक्षणाची तातडीची गरज असल्याचे सर्व भागधारकांचे एकमत होते, तरी संपूर्ण देशभर व्यापकपणे अंगिकारता येईल, असे मूल्यशिक्षणाचे कोणतेही आदर्श प्रतिमान (मॉडेल) अस्तित्वात नव्हते.

### टप्पा २: पथदर्शी प्रकल्प (२००९–१५)

या पार्श्वभूमीवर बीजेएसने (BJS) मूल्यशिक्षणासाठी मूल्यवर्धन ही संकल्पना विकसित करून महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील सुमारे ४५० शासकीय प्राथमिक शाळांमध्ये पथदर्शी प्रकल्पाच्या स्वरूपात त्याची अंमलबजावणी केली. यामधील दृष्टिकोन मूल्यशिक्षण शालेय विषयांतून एकात्म रीतीने न देता स्वतंत्रपणे देण्याच्या म्हणजेच प्रत्यक्ष पद्धतीवर आधारित होता. या प्रकल्पाच्या परिणामकारकतेचा अभ्यास केंब्रिज विद्यापीठाचे डॉ. डेव्हिड व्हाईटब्रेड आणि अमेरिकेतील ओरेगॉन विद्यापीठाचे डॉ. ब्रायन फ्ले यांनी केला. याशिवाय मूल्यवर्धनचे शैक्षणिक साहित्य आणि शिक्षणपद्धती यांचे मूल्यांकन एनसीईआरटी (NCERT) या संस्थेकडूनही करण्यात आले.

या अनुभवातून एक महत्त्वाचा बोध झाला, तो म्हणजे सहयोगी अध्ययन पद्धतीचा अंतर्भाव असलेल्या कृतींवर आधारित उपक्रमांतून प्रत्यक्षपणे मूल्यशिक्षण देण्याच्या कार्यपद्धतीचे स्वागत सर्व शिक्षक, प्रशासक इत्यादी भागधारक उत्साहाने करतात. विद्यार्थ्यांच्या वर्तनावर या शिक्षणाचा सकारात्मक परिणाम लक्षणीयरीत्या जाणवतो. या वैशिष्ट्यांमुळेच शालेय धोरणांशी आणि अभ्यासक्रमाशी सुसंगत राहून आखणी केलेल्या मूल्यवर्धनचा व्यापक प्रमाणातील विस्तार सुकर झाला.

### टप्पा ३: मूल्यवर्धनचा विस्तार (२०१५–२०२०)

या नंतर मूल्यवर्धनचा विस्तार करताना, भारतीय संविधान, शिक्षणहक्क कायदा आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ (NCF 2005) यांच्याशी सुसंगत असलेला मूल्यवर्धनचा एक संकल्पनात्मक आराखडा विकसित करण्यात आला. या आराखड्यावर आधारित शैक्षणिक साहित्य अनेक भाषांमध्ये विकसित करण्यात आले.

या आराखड्याचे आणि शैक्षणिक सामग्रीचे एससीईआरटीकडून (SCERT) यथायोग्य समीक्षण झाल्यानंतर, महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व शासकीय प्राथमिक शाळांमध्ये मूल्यवर्धन कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला. या कार्यक्रमाचे स्वामित्व शासनाने स्वीकारल्यानंतर फाऊंडेशनकडून त्यासाठी शिक्षक क्षमताविकासासाठी तांत्रिक सहाय्य पुरविण्यात आले. गोवा शासनानेही आपल्या शासकीय व अनुदानित शाळांमध्ये मूल्यवर्धन राबवण्याचा निर्णय घेतला. गुजरात शासनाने पोरबंदर या एका जिल्ह्यात मूल्यवर्धन प्रकल्प प्रायोगिक स्वरूपात सुरू केला.

या राज्यांमध्ये सर्वच स्तरांवरील भागधारकांकडून मूल्यवर्धन कार्यक्रमाचे स्वागत झाले. शिक्षक आणि पालकांनी विद्यार्थ्यांच्या वर्तनामध्ये लक्षणीय बदल झाल्याचे अभिप्राय दिले. अनेक शिक्षकांनी आपल्या अध्यापन पद्धती आणि विद्यार्थ्यांशी वागणूक या संदर्भात स्वतःमध्ये देखील बदल झाल्याचेही अनुभव कथन केले. निरीक्षण व स्वतंत्र अभ्यासातून या परिणामांविषयी पुष्टीच मिळाली.

## टप्पा ४: मूल्यशिक्षण प्रतिमान (मॉडेल) व राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ यातील सुसंगती

फाऊंडेशनने मूल्यकेंद्रित शालेय शिक्षणासाठी एक प्रतिमान (मॉडेल) विकसित केले. यातील कार्यपद्धती शाळांना आनंददायी, समावेशक आणि मानसिकदृष्ट्या पोषक वातावरणात विद्यार्थ्यांसाठी समग्र स्वरूपातील, त्यांना रमवणाऱ्या शैक्षणिक अनुभवांचे आयोजन करता यावे, यासाठी मार्गदर्शन करते. यामध्ये पालकांची सक्रिय भागीदारीही महत्त्वाची आहे. (आकृती १ पाहा.)

मूल्यवर्धनच्या या सर्वसमावेशक प्रतिमानामध्ये (मॉडेल), फाऊंडेशनने विविध गरजा आणि संदर्भ यांची दखल घेण्यासाठी स्वतंत्र रचना केलेले उपक्रम सुचवले आहेत.

प्रस्तुत मूल्यवर्धन आवृत्ती, 3.0 या दृष्टिकोनानुसार विकसित करण्यात आली असून, शाळा आणि शालेय व्यवस्थांना राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ मध्ये दिलेल्या आदेशांनुसार मूल्यशिक्षण देता यावे, यासाठी तयार करण्यात आली आहे. हे नव्याने विकसित करण्यात आलेले शैक्षणिक साहित्य आणि शिक्षक क्षमताविकास कार्यक्रम यांचा महाराष्ट्र आणि गोवा शासनाने पुनरावलोकन करून स्वीकार केला आहे. हीच मूल्यवर्धन आवृत्ती दादरा-नगर हवेली आणि दमण, दिव या केंद्रशासित प्रदेशांमध्ये, तसेच भारतातील अनेक खाजगी शाळांमध्ये देखील अंगिकारण्यात आली आहे.




**आकृती १ : मूल्यशिक्षण प्रतिमान (मॉडेल) व अभ्यासक्रम आराखड, २०२३ यातील सुसंगती.**

# २ मूल्यवर्धनची प्रमुख वैशिष्ट्ये

या विभागात सध्याच्या मूल्यवर्धन आवृत्तीची प्रमुख वैशिष्ट्ये आणि ती राज्य अभ्यासक्रमविषयक व शालेय प्रक्रियांसाठी मार्गदर्शक असलेल्या राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ या दस्तावेजाशी कशी सुसंगत आहेत, हे स्पष्ट केले आहे.

मूल्यवर्धन पुढील विविध स्तरांवर राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ शी सुसंगत आहे :

- उद्दिष्टे
- गाभाभूत मूल्ये
- मूल्यशिक्षणविषयक दृष्टिकोन
- सामाजिक, भावनिक व नैतिक विकासावर (SEED) भर
- राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्या मधील अभ्यासक्रमाची ध्येये
- अध्यापन पद्धती
- विद्यार्थी मूल्यमापन

## उद्दिष्टे

आपल्या संविधानात अपेक्षित असलेल्या समतावादी, समावेशक व बहुविध समाजाच्या निर्मितीसाठी सामाजिक योगदान देतील, असे नागरिक शाळांनी घडवावेत, असे उद्दिष्ट शाळांना एनसीएफ २०२३ मध्ये सुस्पष्टपणे बंधनकारक करण्यात आले आहे (NCF 2023, पृ. १५८).

या उद्दिष्टाशी सुसंगत राहून, विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेतील मूल्ये अंगिकारलेले जबाबदार, संवेदनशील आणि उत्पादक असे सक्षम नागरिक घडवण्याच्या दृष्टीने मूल्यवर्धनची रचना केली आहे.

## गाभाभूत मूल्ये

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ मध्ये सूचवलेली गाभाभूत मूल्ये पुढीलप्रमाणे आहेत : लोकशाहीवादी दृष्टिकोन आणि स्वातंत्र्याबाबतची बांधिलकी, समानता, न्याय व निष्पक्षतेसाठी प्रयत्न, विविधता, बहुविधता, समावेशकता स्वीकारताना अंतर्निहित ऐक्याची जाणीव ठेवणे, माणुसकी, करुणा, समानानुभूती आणि बंधुभाव, स्वातंत्र्य व हक्कांबरोबरच येणाऱ्या जबाबदाऱ्या, सामाजिक जबाबदारी व सेवाभाव, प्रामाणिकपणा व सचोटीचे नैतिक तत्वज्ञान (NCF पृ. १५९).

वरील मूल्यांशी सुसंगत राहून, भारतीय संविधानाच्या उद्देशिकेतील स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता या मूल्यांच्या आधारावर मूल्यवर्धन कार्यक्रम विकसित केला आहे. याचबरोबर संवैधानिक मूल्यांशी संबंधित असणाऱ्या मूल्यांची समावेश केला आहे.

## मूल्यशिक्षणाविषयीचा दृष्टिकोन

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ मध्ये मूल्ये आणि वृत्तींचा विकास करण्यासाठी प्रत्यक्ष (direct) आणि अप्रत्यक्ष (indirect) या दोन्ही मूल्यशिक्षणपद्धतींचा अवलंब करावा असे प्रस्तावित केले आहे (NCF, पृ. १६०).

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ नुसार प्रत्यक्ष मूल्यशिक्षण पद्धतीत, खासपणे नैतिक जागरूकता आणि विचारसरणी विकसित करण्यासाठी म्हणून तयार केलेले वर्गउपक्रम, वर्गचर्चा व वाचनविधी यांचा समावेश असावा, अशी शिफारस आहे (NCF, पृ.१६०). तर अप्रत्यक्ष पद्धतीत, अध्ययन–मानके, अध्ययन–अध्यापन प्रक्रिया, शालेय संस्कृती व वर्गातील संस्कृती आणि नित्य व्यवहार इत्यादींमध्ये मूल्यांचे एकात्मिकरण साधण्याची शिफारस करण्यात आली आहे (NCF, पृ. १६१).

## मूल्यशिक्षणासाठी प्रत्यक्ष व एकात्मिक दृष्टिकोन

मूल्यशिक्षण देताना, मूल्यवर्धन हे वरील दोन्ही पद्धतींमधील अपेक्षा पूर्ण करते. प्रत्यक्ष पद्धतीचा वापर करून संविधानिक व संबंधित मूल्ये रुजवण्यासाठी उपक्रम आयोजित केले जातात, तर एकात्मिक दृष्टिकोनाद्वारे मूल्यशिक्षण देताना मूल्यवर्धन स्वीकारलेल्या शाळांतील सर्वजण सहभागी होऊ शकतील, असे समग्र शाळा उपक्रम आयोजित करता येतात.

प्रत्यक्ष दृष्टिकोनाची अंमलबजावणी करताना शाळेच्या साप्ताहिक वेळापत्रकातील ठराविक कालावधी संरचित मूल्यवर्धन उपक्रमांसाठी राखून ठेवावा लागतो. विशिष्ट मूल्ये आणि जबाबदारीने निर्णय घेण्याची क्षमता, नैतिक विचार अशा संबंधित क्षमता विकासित करण्यासाठी हे उपक्रम तयार केलेले असतात. (वेळवाटपाबाबतची माहिती चौकट १, पृष्ठ १२ मध्ये दिली आहे.)

एकात्मिक किंवा अप्रत्यक्ष दृष्टिकोनाचा अवलंब करण्यासाठी इच्छुक शाळा, शालेय व्यवस्था, शालेय विषयांच्या अध्ययन–अध्यापन, शाळेच्या दैनंदिन कामकाज यामधून आणि संपूर्ण शाळा स्तरावरील उपक्रम (उदा परिपाठ, सहशालेय उपक्रम इ.) आयोजनातून मूल्यशिक्षण देता यावे, या दृष्टीने क्षमताविकास करण्यासाठी फाऊंडेशनकडून साहाय्य केले जाते. (अधिक माहितीसाठी चौकट २, पृष्ठ १३ पहा.)

## सामाजिक, भावनिक व नैतिक विकासावर भर

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ मध्ये शाळांनी सामाजिक, भावनिक आणि नैतिक विकास (SEED) या क्षेत्राची, मुलांच्या सर्वांगीण विकासातील एक महत्त्वाचे क्षेत्र म्हणून हाताळणी करावी यावर भर दिला आहे. या दस्तऐवजामध्ये शैशवावस्थेपासून किशोरावस्थेपर्यंत सामाजिक, भावनिक व नैतिक विकास कसा घडतो याची रूपरेषा स्पष्ट केली आहे. तसेच या क्षेत्राचा संबंध, मानसिक विकास (भावनिक आणि मानसिक विकास) आणि चैत्सिक विकास (आध्यात्मिक विकास) यांच्याशी पंचकोष (पाच पदरी) विकास प्रतिमांनाद्वारे (मॉडेल) जोडून दाखविला आहे (NCF, पृ. ६७–६८).

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ मध्ये पायाभूत स्तरावरील उद्दिष्टांची यादी दिली आहे आहे. त्यामधील SEED विषयक उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत :

- भावनिक बुद्धिमत्ता, म्हणजेच आपल्या भावना समजून घेऊन यांचे व्यवस्थापन करता येणे आणि सामाजिक संकेतांच्या चौकटीत त्यांना सकारात्मक प्रतिसाद देता येणे.

- उत्पादक आणि सेवाकार्याविषयी सकारात्मक वृत्ती
- नैसर्गिक पर्यावरणाविषयी सकारात्मक आदर (NCF, पृ.२१७).

## क्षमता

खालील सहा क्षेत्रांमध्ये काही महत्त्वाच्या क्षमतांचा विकास करणे हा मूल्यवर्धनच्या शिक्षण साहित्याचा उद्देश आहे:

- स्व-जाणीव आणि स्व-व्यवस्थापन
- जबाबदारीने निर्णय घेणे
- इतरांविषयी काळजी घेणे
- सुसंवादी नातेसंबंध
- पर्यावरणाविषयी काळजी आणि इतरांच्या कल्याणासाठी योगदान देणे

या सर्व क्षमता सामाजिक भावनिक अध्ययनासंदर्भात जागतिक पातळीवर मान्यता मिळालेल्या CASEL आराखड्याच्या आधारे निश्चित केल्या आहेत. परिशिष्ट १ मध्ये दाखविल्याप्रमाणे अभ्यासक्रम विषयक ध्येयांशी या क्षमतांची सुसंगती स्पष्ट केली आहे.

## अभ्यासक्रमातील उद्दिष्टांशी सुसंगती

मूल्यवर्धन उपक्रमांची रचना राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ मध्ये दिलेली गाभाभूत मूल्ये, SEED क्षमता तसेच पायाभूत, पूर्वतयारी व पूर्वमाध्यमिक शालेय स्तरावरील (इयत्ता १-२, ३-५ व ६-८) अभ्यासक्रमाची प्रमुख उद्दिष्टे या सर्वांच्या प्राप्तीच्या दृष्टीने केली आहे. आकृती २ मध्ये याचे रचनाचित्र दाखवले आहे.

मूल्यवर्धन उपक्रम विकसनासाठीची अभ्यासक्रम उद्दिष्टे, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ मध्ये नमूद केलेल्या शिक्षणाच्या खालील क्षेत्रांतून घेतली आहेत :

- पायाभूत स्तरावरील विषयक्षेत्रे
- भाषाशिक्षण
- सामाजिक विज्ञान शिक्षण
- आंतरविद्याशाखीय शिक्षण क्षेत्रे
- शारीरिक शिक्षण व आरोग्य/कल्याण

मूल्यवर्धन उपक्रमांमध्ये समाविष्ट केलेल्या इयत्तानिहाय क्षमता, अभ्यासक्रमातील ध्येये/उद्दिष्टे आणि मूल्ये या आराखड्याच्या परिशिष्ट क्र.१ मध्ये नमूद केली आहेत. सर्पिलाकार अभ्यासक्रम रचना वापरून याच क्षमता आणि मूल्ये यांची मांडणी व हाताळणी सर्व इयत्तांमध्ये केली आहे. शालेय स्तरानुसार अभ्यासक्रमाची उद्दिष्टे बदलत जातात. मूल्यवर्धनमध्ये प्रत्येक शालेय स्तरावर मागील किंवा पुढील स्तरावरीलही काही उद्दिष्टांवर आधारित उपक्रमांचा समावेश आहे, तथापि या उपक्रमांशी संबंधित अध्ययन निष्पत्तींचा स्तर मात्र इयत्तांच्या क्रमानुसार कमी-जास्त ठेवलेला आहे.

याप्रकारे काळजीपूर्वक आणि विचारपूर्वक केलेल्या मूल्यवर्धन उपक्रमांच्या रचनेमुळे, मूल्यवर्धन उपक्रम शाळांना वरील नमूद क्षेत्रांतील शिक्षणासाठी NCF द्वारा निर्धारित केलेली मानके पूर्ण करण्यासाठी मदत करतील.




आकृती २ : मूल्यवर्धन उपक्रमांची रचना

## अध्ययन अध्यापनविषयक कार्यपद्धती

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ मध्ये अध्ययन–अध्यापनाचे सर्व पैलू सामावणारी पुढील सर्वसाधारण मार्गदर्शक तत्त्वे विहित केली आहेत. (पृ.११४–११५):

- शिक्षण ही समजून घेणे आणि कृती करणे या दोन्हींचा समन्वय असणारी एक सक्रिय प्रक्रिया आहे.
- जेव्हा मुलांना सन्मानपूर्वक वागणूक देऊन महत्त्व दिले जाते आणि शिकण्याच्या प्रक्रियेत त्यांचा सहभाग असतो, तेव्हा त्यांचे घडणारे अध्ययन सर्वोत्तम असते.
- मुले अनेकविध मार्गांनी शिकत असतात. उदाहरणार्थ: काहीतरी निर्मिती करून, चर्चेत सहभागी होऊन, ऐकून, बोलून, वाचून, लिहून, प्रश्न विचारून, अशा कितीतरी प्रकारांनी शिकतात.
- जेव्हा वर्गातील अध्ययन–अध्यापन प्रक्रियांचे नाते विद्यार्थ्यांच्या जीवनाशी व पूर्वानुभवांशी जोडले जाते, त्यावेळी ते शिकण्याची कमाल पातळी गाठू शकतात.
- शिक्षा व भीती हे शिकण्याच्या प्रक्रियेला मारक ठरतात, त्यामुळे शिकताना त्यांचा वापर अजिबात होता कामा नये.

- जात, लिंग, धर्म, सामाजिक–आर्थिक स्तर, शैक्षणिक कामगिरी किंवा इतर कोणत्याही आधारावर वर्गात असमानता अस्तित्वात असणे अस्वीकार्य आहे.
- पाठांतर हे शिकण्याचे किंवा मूल्यमापनाचे प्रमुख साधन असता कामा नये.
- विद्यार्थ्यांना माहितीचे केवळ 'निष्क्रिय ग्राहक' असे समजून चालणार नाही. त्यांना स्वतःच्या शिक्षणात सक्रिय भूमिका बजावणारे महत्त्वाचे घटक या दृष्टिकोनातून पाहिले गेले पाहिजे.

मूल्यवर्धन उपक्रमातील अध्ययन–अध्यापन पद्धती वरील सर्व तत्त्वांशी पूर्णपणे सुसंगत आहे. पारंपरिक मूल्यशिक्षणाच्या तुलनेत, मूल्यवर्धनमध्ये सर्वच अध्ययन कृती आणि उपक्रमांतून हे तत्त्व अंगिकारले आहे. रचनावादी (constructivist) व सहयोगी अध्ययन (cooperative learning) या शिक्षणपद्धतींच्या पायावर मूल्यवर्धन उपक्रमांची उभारणी केली आहे.

प्रत्येक मूल्यवर्धन उपक्रमात विद्यार्थ्यांना वैयक्तिकपणे, जोडीमध्ये अथवा लहान लहान गटात काम करावे लागते. अशाप्रकारे काम करताना स्वतंत्र विचार, सर्जनशीलता, चर्चा, विश्लेषण व चिकित्सक मूल्यमापन करावे लागते. त्यातून विशिष्ट अध्ययन निष्पत्ती साध्य होतात. उपक्रमातील कृती करताना विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनातील अनुभवांचा आणि व सामाजिक, भौतिक परिसराचा संदर्भ घ्यावा लागतो.

## सहयोगी शिक्षण

सहयोगी शिक्षण हा मूल्यवर्धनमधील उपक्रमांचा एक अविभाज्य भाग आहे आणि याला राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ मधील पुढील शिफारशींचा आधार आहे :

*वर्गातील शैक्षणिक प्रक्रिया या विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे व एकत्रितपणे, अशा दोन्ही प्रकारे काम करण्याच्या संधी देणाऱ्या असाव्यात. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना जोड्यांमध्ये, लहान–मोठ्या गटांमध्ये आणि स्वतंत्रपणेही काम करता येईल याची दक्षता घेणे योग्य ठरेल. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना ऐकण्याची, समजून घेण्याची, रसग्रहण करण्याची, स्वतःच्या आणि इतरांच्याही अनुभवाबाबत समानुभूतीने आणि चिकित्सकपणे समजून घेऊन चिंतन करण्याची संधी द्यावी (NCF, पृ.१०५–१०६).*

मूल्यवर्धनमधील वर्गउपक्रमांसाठी सहयोगी अध्ययन पद्धती वापरली आहेच, पण याशिवाय वर्गात किंवा वर्गाबाहेर हवे त्यावेळी खेळता येतील असे अनेक सहयोगी खेळही सुचवले आहेत.

## वर्गव्यवस्थापन

मूल्यवर्धनमधील बालकेंद्रित वर्गव्यवस्थापन पद्धती, त्यातील बालकेंद्रित, कृतीआधारित अध्ययन–अध्यापन पद्धतींना साजेशी आणि पूरक आहे. या व्यवस्थापन पद्धतीचा उद्देश विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग, स्वयंशिस्त आणि सहयोगी वृत्ती यांना चालना देणारे, आनंददायी व समावेशक शैक्षणिक वातावरण राखणे, असा आहे. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी स्वतःच आपले वर्गनियम व ते पाळण्याचे किंवा न पाळण्याचे परिणामही ठरवतात. काही मुलांचे वर्तन अध्ययनात व्यत्यय आणणारे असू शकते. असे वर्तन हाताळण्यासाठी शिक्षकांना या मुलांच्या समवेत सकारात्मक रीतीने आणि स्नेहपूर्ण संवाद साधण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.

## गृहकार्य

अनेक मूल्यवर्धन उपक्रमांमध्ये घरी करावयाच्या कृती हा एक महत्त्वाचा भाग आहे. पारंपरिक गृहपाठापेक्षा यांचे स्वरूप खूप वेगळे असते. यांचा उद्देश शिकले ते दृढ होण्याखेरीज विद्यार्थी व पालकांमध्ये संवाद निर्माण करणे, शेजाऱ्यांशी संवाद साधणे, असा असतो. याशिवाय काही विशिष्ट उपक्रमांचा भाग म्हणून निकटच्या सामाजिक व भौतिक वातावरणाचा/परिसराचा डोळसपणे शोध घेणे असाही उद्देश असतो. ही सारी उद्दिष्टे राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ च्या गृहकार्यावरील शिफारशींशी पूर्णतः सुसंगत आहेत; त्या शिफारशी अशा: गृहकार्य हा शिकण्याच्या प्रक्रियेचाच विस्तार असतो. गृहकार्य हे, काहीतरी शिकता येईल असे अर्थपूर्ण असले पाहिजे. यात सराव (उदा. कृतिपत्रिका पूर्ण करणे) तसेच विविध संकल्पनांचे उपयोजन (उदा. स्थानिक जलस्रोतांचे सर्वेक्षण) यांचा समावेश असू शकतो. गृहकार्य मुलांना मजेदार वाटेल, असे असू शकते आणि विद्यार्थ्यांसाठी एक वेगळे मनोरंजक आव्हान असू शकते. विशेषतः पायाभूत आणि पूर्वतयारी या शिक्षणस्तरांवर गृहकार्य हे शाळा आणि घर यात चांगले बंध निर्माण करू शकते (NCF, पृ. ११०).

## सर्पिल परिणाम

मूल्यवर्धन उपक्रमातील अध्यापन पद्धतींचा अध्ययनावर होणारा विकासात्मक परिणाम पुढीलप्रमाणे होतो :

- यातील विविध पद्धतींमुळे मूल्ये व SEED क्षमतांचा विकास होतो. याशिवाय बोधात्मक व भाषिक क्षमताही विकसित होतात.
- या अध्यापन पद्धतींमुळे शिक्षकांची कृतीआधारित अध्ययन पद्धतींचे आयोजन करण्याची क्षमता वाढते. अनेकदा मूल्यवर्धन उपक्रमांचे आयोजन करता करता शिक्षक सहजपणे पारंपरिक अध्यापन पद्धतीची चाकोरी सोडून अधिक प्रभावी पद्धतींकडे वळतात.

या सर्व पद्धती इतर कोणत्याही इयत्तेतील, कोणत्याही विषयाच्या अध्यापनासाठी वापरता येतात.

## विद्यार्थी मूल्यमापन : NCF च्या शिफारसी

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ नुसार मूल्यविकासाचे मूल्यमापन करताना खालील प्रक्रिया वापरण्याची शिफारस केली आहे:

- विद्यार्थ्यांच्या एखाद्या मूल्याची किंवा वृत्तीची झलक दाखवणाऱ्या वर्तनावर लक्ष केंद्रित करावे.
- मूल्यविकासाच्या मूल्यमापनासाठी रुब्रिक्स तयार करावेत. ते विद्यार्थ्यांच्या नियतकालिक (साप्ताहिक/मासिक/सत्रान्त इ.) प्रगती अहवालाचा भाग असावेत आणि व विधायक स्वरुपात असावेत.
- विद्यार्थ्यांनी लिहिलेली चिंतनात्मक रोजनिशी किंवा इतर सामग्री, गटचर्चा, एखाद्या विषयावरील सादरीकरण व सामुदायिक सेवा किंवा शालेय कार्यक्रमातील सहभाग यांचे विश्लेषण करावे (NCF, पृ. १६३).

## मूल्यवर्धनमधील मूल्यमापन प्रक्रिया

या सगळ्या अपेक्षांना अनुसरून मूल्यवर्धन अंतर्गत होणारे मूल्यांकन यापूर्वी उल्लेख केलेल्या आठ SEED क्षमतांच्या वर्तनात्मक निर्देशकांच्या (behavioural indicators) आधारे केले जाते. राज्यातील तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार, प्रत्येक इयत्तेमधील मूल्यमापनासाठी, आवश्यक क्षमता आणि वयोगटानुसार योग्य निर्देशकांची निवड केली आहे. बालविकास ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया असते हे लक्षात घेऊन जसजशा इयत्ता वाढतील तसतशी अपेक्षांचा स्तर वाढत जातो.

### मूल्यमापन प्रक्रिया

मूल्यांकन निर्देशक, उपक्रम पुस्तिकेतच समाविष्ट आहेत. मूल्यांकन साधन देखील इतर उपक्रमांप्रमाणेच एक उपक्रम म्हणून समाविष्ट केले आहे. त्यामुळे मूल्यांकनाचे दडपण कमी होईल. हे मूल्यांकन उपक्रम वर्षातून दोनदा (प्रत्येक शालेय सत्रानंतर) आयोजित केले जातील. या उपक्रमांमध्ये संख्यात्मक गुणांकन आणि गुणात्मक मूल्यांकनाचा समावेश आहे. खालील ७ टप्प्यांतून ही प्रक्रिया पूर्ण होते:

- प्रथम विद्यार्थ्यांना स्वयं-मूल्यमापन करावे लागते.
- विद्यार्थी त्यांच्या गुणांकनाविषयी आपल्या सहाध्यायांबरोबर चर्चा करतात. इयत्ता ६ वी ते ८ वी मध्ये विद्यार्थी त्यांच्या जोडीदाराचेही मूल्यमापन करतात.
- शिक्षक मूल्यांकनाविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा करतात.
- शक्य असल्यास, शिक्षक पालकांकडूनही विद्यार्थ्यांच्या घरातील वर्तनाविषयी माहिती घेतात.
- वरील सर्व माहिती आणि सत्रातील निरीक्षणाच्या आधारे शिक्षक वर्तन निर्देशकांनुसार विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करतात.
- शिक्षक विद्यार्थ्यांच्या उपक्रम पुस्तिकेत गुणात्मक अभिप्राय लिहितात. त्यामध्ये विद्यार्थ्यांची सकारात्मक गुणवैशिष्ट्ये आणि सुधारण्याची क्षेत्रे यांचा उल्लेख असतो.
- शिक्षक विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांबरोबर त्यांच्या मूल्यमापनाची चर्चा करतात.

ही सर्व प्रक्रिया राष्ट्रीय शिक्षण धोरण, २०२० मध्ये सुचवलेल्या समग्र प्रगतिपत्रकाशी (HPCs) सुसंगत आहे, आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ मध्येही याचा पुनरुच्चार केला आहे, तो असा:

प्रगतिपत्रक हा सर्वांगीण, ३६०-अंशात्मक(डिग्री), बहुआयामी दस्तऐवज असेल. त्यात प्रत्येक विद्यार्थ्याची बोधात्मक, भावनिक व क्रियात्मक प्रगती व खास व्यक्तिगत वैशिष्ट्ये तपशीलवार दर्शवलेली असतील. यामध्ये शिक्षकांच्या मूल्यमापनासोबतच विद्यार्थ्यांचे स्वयंमूल्यमापन व सहाध्यायी मूल्यमापन समाविष्ट असेल. हे प्रगतिपत्रक शाळा व घर यांच्यातील महत्त्वाचा दुवा ठरेल आणि पालक-शिक्षक बैठकांमध्ये याविषयी चर्चा होईल. त्यामुळे पालकांना त्यांच्या पाल्याच्या सर्वांगीण शिक्षण आणि विकास प्रक्रियेत सक्रिय सहभागी होता येईल (NCF, पृ. ११५).

**चौकट १: उपक्रमांसाठी वेळवाटप**

वर्षभरात कोणत्याही एका इयत्तेसाठी सर्व मूल्यवर्धन उपक्रम आयोजित करण्यासाठी, शाळांना प्रत्येक इयत्तेसाठी आठवड्यातून किमान दोन तासिका (किंवा ७०–९० मिनिटे) राखून ठेवाव्या लागतील. एकूण गरज ३५ घड्याळी तास एवढी असेल. ही गरज जागतिक स्तरावर अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या सामाजिक–भावनिक शिक्षण (SEL) कार्यक्रमांच्या वेळवाटपाशी सुसंगत आहे; तसेच हा कालावधी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ मध्ये विहित केलेल्या वार्षिक शैक्षणिक कालावधीच्या ४% पेक्षाही कमी आहे.[६] राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ आधारे हा कालावधी उपलब्ध होण्यासाठी पुढील संधीचा वापर करता येईल.

- पायाभूत स्तरावर: दररोज 'सर्कल टाईम'साठी ३०–४५ मिनिटे राखून ठेवावीत. त्यामध्ये संभाषण, गाणी व कविता यांचा समावेश आवश्य असावा (NCF तक्ते 4.2ii, 4.2iii).
- पूर्वतयारी स्तरावर: 'आपल्या भोवतालचे जग' या विषयासाठी वर्षभरात २०० तास राखून ठेवले जावेत. (तक्ता 4.4i), हे एक आंतरविद्याशाखीय क्षेत्र आहे. विद्यार्थ्यांमध्ये जागतिक नात्यांची वीण आणि परस्पर अवलंबित्व यांची समज येऊन जगाविषयी एक समग्रदृष्टी निर्माण होणे गरजेचे आहे. या दृष्टीने ज्ञान प्राप्त करणे, मूल्ये आणि इष्ट वृत्ती विकसित करणे यासाठी विद्यार्थी सक्षम व्हावा, हा उद्देश एवढे तास राखून ठेवण्यामागील आहे
- पूर्वमाध्यमिक स्तर: दरवर्षी ३ भाषांसाठी २१० तास आणि सामाजिक विज्ञानासाठी १६० तास राखून ठेवावयाचे आहेत (तक्ता 4.4iii). या एकूण ३७० तासांमधून मूल्यवर्धन उपक्रमांसाठी वेळ उपलब्ध करून घेणे हे समर्थनीय आहे, कारण हे उपक्रम भाषा व सामाजिक विज्ञान शिक्षणाच्या उद्दिष्टांशी सुसंगत आहेत. ही उद्दिष्टे मूल्यवर्धन उपक्रमातून काही प्रमाणात साध्य होऊ शकतात.

६. पायाभूत स्तर, पूर्वतयारी स्तर, पूर्व माध्यमिक स्तर टप्प्यांसाठी, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२३ ( २०२३) दर आठवड्याला २९ तासांचे अध्यापन आणि अंदाजे ३४ कार्यरत आठवड्यांचे नियोजन (पृ. १३५) सुचवतो, म्हणजेच एकूण ९८६ तासांचे शैक्षणिक वर्ष.

### चौकट २: मूल्यशिक्षणासाठी एकात्मिक दृष्टिकोन

शालेय पातळीवर मूल्यशिक्षणाचा एकात्मिक दृष्टिकोन अंगीकारण्यासाठी, शालेय नेतृत्वाकडून काही मूलभूत मूल्यांविषयी बांधिलकी असणे आवश्यक आहे. वर्गस्तरावर, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ मध्ये सुचवलेल्या अध्यापन पद्धतींनुसार, सर्व विषयांमध्ये मूल्यांचे एकात्मीकरण साधण्यासाठी आव्हानात्मक उपक्रम आयोजन तसेच वर्गचर्चा आयोजनासंदर्भातील तज्ज्ञता आवश्यक आहे.

या गरजा लक्षात घेता, फाऊंडेशनची अशी शिफारस आहे, की शाळांनी प्रथम मूल्यशिक्षणाचा प्रत्यक्ष दृष्टिकोन (direct approach) स्वीकारावा, कारण त्यामुळे शिक्षकांची पारंपरिक/प्रचलित अध्यापन पद्धतींकडून आदर्श अध्यापनापर्यंतची वाटचाल सुरळीतपणे होते. मूल्यशिक्षणात प्रत्यक्ष दृष्टिकोन अंगिकारल्यामुळे विद्यार्थ्यांची वर्तणूक व शिक्षकांच्या धारणा यामध्ये सकारात्मक बदल घडून येतात. त्यामुळे शाळाप्रमुखांची एकात्मिक दृष्टिकोन स्वीकारण्यासाठीची मानसिकता तयार होते, उत्साह वाढतो. तसेच यात पालक व सामाजिक घटकांचा देखील सहभाग वाढतो. ज्या शाळांना एकात्मिक पद्धत अंगिकारण्यात स्वारस्य आहे, त्यांच्यासाठी फाऊंडेशन (SMF) पुढील प्रकारचे क्षमताविकास (प्रशिक्षण) सहाय्य प्रस्तावित करते :

- **निवडक शिक्षकांसाठी सरावावर आधारित कार्यशाळा व त्यातील विषय पुढीलप्रमाणे :**
  १. अध्ययन–अध्यापन पद्धती, शालेय विषय व आणि पाठ्यपुस्तकात अंतर्भूत असलेली मूल्ये
  २. विविध विषयांच्या अध्ययन–अध्यापनामध्ये उपक्रम व सहयोगी शिक्षणरचनांचा वापर
  ३. पाठ्यपुस्तकातून निवडलेल्या आशयामध्ये मूल्यांचे एकात्मिकरण केलेली पाठटाचणे तयार करणे
  ४. मूल्यशिक्षण देताना उद्भवणारे मूल्य–संघर्ष तसेच मोठ्या वर्गांतील मूल्यशिक्षणाचे व्यवस्थापन अशा आव्हानांशी सामना करण्याच्या कार्यपद्धती
- **शाळाप्रमुखांसाठी कार्यशाळामधील विषय पुढीलप्रमाणे :**
  १. विविध शालेय व्यवहार आणि शाळेतील नित्य दिनचर्या यामध्ये मूल्यांचा अंतर्भाव
  २. संपूर्ण शाळास्तरावर (सर्व विद्यार्थ्यांसाठी) आयोजित करता येणाऱ्या मूल्याधारित उपक्रम/कार्यक्रम यांचे नियोजन
  ३. बालकांच्या सर्वांगीण विकासात पालक व स्थानिक परिसरातील व्यक्तींचा सहभागी करून घेण्यासाठी धोरणे
  ४. या उपक्रमांचे यश शाळेचे सहाय्यक मानवी घटक आणि त्यांच्यावर सोपवलेली 'कामगिरीची उद्दिष्टे' यावर अवलंबून असेल.

# ३ शैक्षणिक साहित्य

मूल्यवर्धनचे वर्गउपक्रम आयोजित करण्यासाठी दोन प्रकारचे शैक्षणिक साहित्य विकसित करण्यात आले आहे :

- इयत्तानिहाय उपक्रम पुस्तिका
- पूरक ध्वनीचित्रफिती (व्हिडिओ)

## उपक्रम पुस्तिका

इयत्ता पहिली ते आठवीसाठी विविध भाषांमध्ये आकर्षक व रंगीत उपक्रम पुस्तिका तयार करण्यात आल्या आहेत.[७] या पुस्तिका विद्यार्थ्यांसाठी तसेच शिक्षकांसाठी वापरण्यायोग्य आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याने एक पुस्तिका वापरायची असून ती शैक्षणिक वर्षाच्या शेवटपर्यंत वर्गातच ठेवली जाते.

या पुस्तिकांमध्ये उपक्रमांची संपूर्ण सूची तसेच विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी पुस्तिका वापराविषयीच्या स्पष्ट सूचना समाविष्ट आहेत. प्रत्येक इयत्तेसाठी ३५ ते ४० उपक्रम समाविष्ट केलेले आहेत.

### विभाग आणि घटक

सर्व इयत्तांतील उपक्रम खालील विभागांमध्ये विभागलेले आहेत:

- वर्गनियमन
- स्व–जाणीव
- वैयक्तिक जबाबदाऱ्या
- नातेसंबंध
- सामाजिक जबाबदाऱ्या

इयत्ता पहिली ते आठवीमधील तीन शालेय स्तरांवर वरील विभागांतर्गत येणारे घटक ‘तक्ता १’ मध्ये दिलेले आहेत. अनेक घटक हे सर्व इयत्तांमध्ये सामाईक असून, त्यांची काठीण्यपातळी वाढत जाते. या घटकांवरील उपक्रमांतून साध्य होणाऱ्या क्षमता आणि व अभ्यासक्रमातील उद्‌दिष्टे प्रत्येक पुस्तिकेच्या प्रस्तावनेत नमूद केलेली आहेत.

### उपक्रमांची रचना

प्रत्येक उपक्रमाची निर्मिती एक किंवा अधिक मूल्ये, क्षमता व अभ्यासक्रम उद्‌दिष्टांशी संबंधित अध्ययन निष्पत्ती साध्य करण्याच्या दृष्टीने केली जाते (उदाहरणासाठी आकृती ३ पाहा). प्रत्येक उपक्रमातून अपेक्षित अध्ययन घडण्यासाठी एक किंवा अधिक विद्यार्थी कृतींचा समावेश असतो. त्या केल्यानंतर त्यावर वर्गात मुलांशी चर्चा केली जाते. उपक्रमातील सर्व पायऱ्या वेळापत्रकातील ३५ मिनिटांच्या एक किंवा अधिक तासिकांमध्ये पूर्ण करता येतात (आकृती ४ पाहा).

७. उपक्रम पुस्तिका उपलब्ध आहेत. कोकणी भाषेमध्ये इयत्ता १ ते ४ साठी पुस्तके उपलब्ध आहेत. इतर भाषांमध्ये पुस्तके मागणीनुसार तयार केली जातील.

**मूल्ये**
स्वातंत्र्य, जबाबदारी

**अभ्यासक्रमातील ध्येये**
स्व-विकास, परिणामकारक संवाद/संप्रेषण

**क्षमता**
स्व-जाणीव, स्व-व्यवस्थापन

**अध्ययन निष्पत्ती**
स्वतःच्या अल्पकालीन आणि दीर्घकालीन महत्त्वाकांक्षा लिहितो, महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी आवश्यक सवयींविषयी चर्चा करतो.

**आकृती ३ : एखाद्या उपक्रमात मूल्ये, अभ्यासक्रम उद्दिष्टे आणि क्षमता कशाप्रकारे समाविष्ट केल्या जातात याचे उदाहरण (इयत्ता ५ : 'माझी ध्येये')**

स्वतःच्या कल्पना (महत्त्वाकांक्षा) लिहितो.

जोडीमध्ये त्याविषयीच्या कल्पनांची चर्चा करतो.

व्यक्तिगतपणे त्यासंबंधित मजकूर वाचतो (एका मुलीच्या महत्त्वाकांक्षेविषयी).

पुस्तिकेत त्याखाली दिलेल्या प्रश्नाचे उत्तर लिहितो.

या उत्तराची जोडीदाराबरोबर चर्चा करतो.

आपले उत्तर संपूर्ण वर्गासमोर सादर करतो/इतरांच्या उत्तरावर अभिप्राय देतो.

वर्गातील चर्चेत सहभागी होतो (महत्त्वाकांक्षापूर्तीसाठी आवश्यक सवयींविषयी).

घरी करावयाची कृती करतो (आपल्या महत्त्वाकांक्षेविषयी घरच्यांशी चर्चा).

**आकृती ४ : इयत्ता ५ च्या 'माझी ध्येये' या उपक्रमामधील विद्यार्थ्यांसाठीच्या अध्ययन कृती**

## अध्ययन आशयाचे प्रकार

मूल्यवर्धन उपक्रमांतील आशय हा आकर्षक मजकूर व चित्रांच्या स्वरूपात असतो. तो खालील विविध प्रकारे सादर केला जातो :

- निरीक्षणासाठी चित्रे
- चित्रकथा
- कविता आणि गाणी
- प्रसंगवर्णने
- गोष्टी
- चित्रपट्टी (कॉमिक स्ट्रिप)
- माहिती देणारा मजकूर
- स्व–मूल्यांकन उपक्रम

मूल्यवर्धन उपक्रम पुस्तिकांमधील आशय व रचना राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ मधील 'पाठ्यपुस्तकांतील महत्त्वाचे घटक' याविषयीच्या शिफारशींशी सुसंगत आहे:

- रचनेतील सौंदर्यदृष्टी/आकर्षकपणा व सुसंगत रचना
- सुस्पष्ट अध्ययन मानके
- सुसंगत रचनात्मक घटक
- उपक्रम व सरावासाठी स्वाध्याय
- अतिरिक्त पूरक साहित्य सुचविणारे संदर्भ (NCF, पृ. ९५–९६)

## पूरक ध्वनीचित्रफिती (व्हिडिओज)

मूल्यवर्धन कार्यक्रमात उपक्रम पुस्तिकांमधील आशयाशी संबंधित असलेल्या तीन प्रकारच्या ध्वनीचित्रफिती (पूरक व्हिडिओज) विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या जातात.

- ॲनिमेटेड गाणी
- ॲनिमेटेड गोष्टी
- ॲनिमेटेड शैक्षणिक व्हिडिओज

दृक–श्राव्य माध्यमामुळे मूल्यवर्धन व्हिडिओज विद्यार्थ्यांचे अवधान राखून ठेवतात, तसेच ते वर्ग अध्ययन–अध्यापनात विविधता निर्माण करतात.

## तक्ता १: मूल्यवर्धन उपक्रमांमधील शालेय टप्प्यानुसार विभाग व घटक

| विभाग | पायाभूत स्तर | पूर्वतयारी स्तर | पूर्वमाध्यमिक स्तर |
|---|---|---|---|
| वर्गनियमन व शिस्त | वर्गनियमन व त्याचे परिणाम | वर्गनियमन व त्याचे परिणाम | वर्गनियमन व त्याचे परिणाम |
| स्व-जाणीव | • स्वतःची ओळख<br>• स्वतःच्या आवडी निवडी<br>• छंद<br>• क्षमता<br>• भावना | • स्वतःची ओळख<br>• छंद<br>• स्वतःची बलस्थाने व मर्यादा<br>• महत्त्वाकांक्षा<br>• भावनांचे व्यवस्थापन<br>• अभ्यासाच्या सवयी | • स्व-प्रतिमा<br>• स्व-विकास<br>• किशोरावस्थेतील समस्या<br>• छंद<br>• स्वतःची बलस्थाने व मर्यादा<br>• भावनांचे व्यवस्थापन,<br>• समानुभूती विकसन<br>• ध्येयप्राप्तीसाठी प्रयत्न |
| वैयक्तिक जबाबदाऱ्या | • शाळेचे नियम<br>• निकोप आरोग्य सवयी<br>• सुरक्षितता<br>• कर्तव्ये<br>• न्याय्यवृत्ती<br>• प्रामाणिकपणा/सचोटी | • शाळेचे नियम<br>• नियमांचे महत्त्व<br>• कर्तव्ये<br>• अभ्यासाच्या सवयी<br>• शारीरिक तंदुरुस्ती<br>• ताणतणाव<br>• रस्तेसुरक्षा<br>• स्क्रीनटाइम<br>• अन्नाची नासाडी<br>• नैतिक निर्णय | • नियम व कायद्यांचे महत्त्व<br>• कर्तव्ये<br>• निकोप आरोग्य सवयी<br>• वैयक्तिक स्वच्छता<br>• ताणतणाव<br>• स्क्रीनटाइम<br>• समाजमाध्यमे (सोशल मिडिया)<br>• हक्क व जबाबदाऱ्या<br>• नैतिक निर्णय<br>• नैतिक द्विधा |
| नातेसंबंध | • कुटुंब<br>• वर्गमित्र<br>• मैत्री<br>• नम्रता<br>• सहकार्य<br>• समानुभूती | • कुटुंब<br>• मैत्री<br>• समवयस्कांचा दबाव<br>• आदर<br>• क्षमाशीलता<br>• सहकार्य<br>• संघर्ष<br>• छळवणूक (bullying) | • कुटुंब<br>• मैत्री<br>• समवयस्कांचा दबाव<br>• प्रभावी संवादकौशल्य<br>• सहकार्य<br>• संघर्ष<br>• छळवणूक (bullying) |
| सामाजिक जबाबदाऱ्या | • विविधता<br>• पर्यावरणाची काळजी<br>• शेजारी<br>• समाजोपयोगी व्यक्ती<br>• कचरा व्यवस्थापन<br>• पाण्याचा वापर<br>• सामाजिक योगदान | • विविधता<br>• परस्परसंबंध<br>• पर्यावरणाची काळजी<br>• सार्वजनिक स्वच्छता<br>• प्रदूषण<br>• पाण्याचा वापर<br>• लिंगविषयक धारणा/ साचेबद्धता<br>• दिव्यांगत्व<br>• सामाजिक योगदान | • विविधता<br>• समानता<br>• भेदभाव<br>• लोकशाही निर्णयप्रक्रिया<br>• महिलांचे योगदान<br>• संसाधनांचा वापर/विनियोग<br>• नागरी समस्या<br>• सामाजिक योगदान |

# ४ सहाय्यक परिसंस्थेची उभारणी

मूल्यवर्धनच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सहाय्यक मानवी घटक आवश्यक असतात. यासाठी खालील बाबी महत्त्वाच्या आहेत :

- शिक्षकांना योग्य वर्गव्यवस्थापन पद्धती अनुसरण्यासाठी तसेच उपक्रम आयोजनासाठी सक्षम करणे
- संनियंत्रण : अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे
- कुटुंबाचा व सामाजिक घटकांचा सहभाग घेणे

या विभागाच्या शेवटी अपेक्षित अडचणींचाही विचार केला आहे.

## मूल्यवर्धनसाठी शिक्षक सक्षमीकरण

शालेय शिक्षणात 'कृतीआधारित शिक्षण' ही संकल्पना भारतात गेल्या अनेक दशकांपासून चर्चेमध्ये आहे. असे असूनही अनेक शिक्षक सर्वसाधारणपणे पारंपरिक अध्यापन पद्धतीच अनुसरत असल्याचे आढळून येते. शिकवण्याची पारंपरिक पद्धती मूल्यवर्धन उपक्रमांच्या आयोजनासाठी अजिबातच उपयोगाची नाही, कारण या उपक्रमांमध्ये शिक्षकांना सहयोगी शिक्षण पद्धतीचा वापर करून, वर्गात मुक्तोत्तरी प्रश्नांच्या आधारे मुलांशी चर्चा करावी लागते आणि उपक्रमांच्या स्वरूपानुसार योग्यप्रकारे वर्गव्यवस्थापनही करावे लागते.

या गरजांची पूर्तता करण्यासाठी, शिक्षकांसाठी क्षमताविकास प्रशिक्षण, हा फाऊंडेशनकडून शाळांना किंवा शालेय यंत्रणांना मूल्यवर्धन अंमलबजावणीसाठी केल्या जाणाऱ्या सहाय्याचा अविभाज्य भाग आहे. शिक्षक क्षमता विकासासाठी खालीलप्रकारे सहाय्य दिले जाते:

- शिक्षकप्रशिक्षक किंवा शिक्षकांसाठी २ ते ४ दिवसांची मूल्यवर्धन परिचय कार्यशाळा (प्रशिक्षणार्थी संख्येनुसार)
- १–२ दिवसांच्या उजळणी (फॉलोअप/रिफ्रेशर) कार्यशाळा
- फाऊंडेशनचे मार्गदर्शक तसेच फाऊंडेशनतर्फे या कामासाठी नियुक्त तज्ज्ञ यांच्यामार्फत शाळा भेटींमधून समक्ष मार्गदर्शन
- ऑनलाइन बैठका, व्हॉट्सॲप समूह व डिजिटल शिक्षण मंच (विकासाधीन) याच्या माध्यमातून संवाद

### मूल्यवर्धन कार्यशाळेचा आराखडा

मूल्यवर्धन परिचय कार्यशाळांमध्ये खालील प्रमुख विषयांचा समावेश असतो :


- राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ मध्ये प्रतिपादन केलेली मूल्यशिक्षणाची गरज
- मूल्यवर्धन उपक्रम पुस्तिकांचा वापर करून मूल्यवर्धन उपक्रमांचे आयोजन
- सहयोगी अध्ययन पद्धतीची शैक्षणिक तत्त्वे व त्यातील विद्यार्थीगटांच्या विविध रचना
- बालस्नेही वर्गव्यवस्थापन तंत्रे
- सुलभक या नात्याने शिक्षकांची भूमिका

- संपूर्ण वर्गचर्चेचे आयोजन
- मूल्यविषयक अध्ययनाचे मूल्यमापन

कार्यशाळांमध्ये वरील सर्व घटकांचा परिचय हा चर्चा व कृती यातूनच करून दिला जातो. कार्यशाळांमधील बहुतांशी वेळ हा शिक्षकांकडून गटागटांतून करावयाच्या मूल्यवर्धन क्रमांच्या सरावासाठी राखून ठेवला आहे. प्रत्येक सराव उपक्रमानंतर प्रशिक्षक त्यावर लगेच अभिप्रायही देतात. आवश्यकतेनुसार बहुवर्ग व बहुभाषिक वर्गात उपक्रम आयोजनात येणाऱ्या अडचणींवरच्या उपाययोजनांविषयी विचारविनिमय केला जातो. शक्य असल्यास मूल्यवर्धन अंतर्गत प्रकल्प आधारित शिक्षणाच्या आयोजनावरही मार्गदर्शन केले जाते.

## क्षमताविकासाच्या व्यापक अंमलबजावणीसाठी धोरण

व्यापक स्तरावर शिक्षक क्षमताविकास (शिक्षक प्रशिक्षण) कार्यशाळांच्या आयोजनासाठी 'आकृती ५' मध्ये दर्शवलेली प्रक्रिया सुचवली आहे. फाऊंडेशनने पारंपरिक बहुस्तरीय प्रशिक्षण कार्यपद्धतीपासून (कास्केड मॉडेलपासून) थोडा वेगळा दृष्टिकोन स्वीकारला आहे. त्यानुसार अशी शिफारस आहे, की शिक्षक-प्रशिक्षकांनी शिक्षकांसाठी कार्यशाळा घेण्यापूर्वी आपल्या वर्गांमध्ये ८ ते १२ आठवडे मूल्यवर्धन उपक्रम आयोजनाचा सराव करून अनुभव घ्यावा.




**आकृती ५ : व्यापक शालेय प्रणालीमधील प्रशिक्षणासाठी सुचवलेली अंमलबजावणी प्रक्रिया**

## मूल्यवर्धन प्रशिक्षण संसाधने

प्रशिक्षणादरम्यान व प्रशिक्षणानंतर शिक्षकांना मदत करण्यासाठी खालील साहित्य विकसित करण्यात आले आहे :

- प्रशिक्षण मार्गदर्शिका
- शिक्षकांसाठी अध्ययन-अध्यापन मार्गदर्शक ध्वनीचित्रफिती (व्हिडिओ)
- स्मार्टफोनवर पाहण्यासाठी संवादात्मक ध्वनीचित्रफिती (व्हिडिओ)

## पुढील संसाधनांच्या आधारे शिक्षकांना अधिक प्रभावीपणे मदत केली जाईल

- ई-लर्निंग अभ्यासक्रम/वेबस्रोत
- मूल्यवर्धन यशोगाथा/यशस्वी अनुभव यांचे ऑडिओ-व्हिज्युअल पद्धतीने किंवा वेब माध्यमे/मुद्रित माध्यमाद्वारे दस्तावेजीकरण व प्रसार

## मूल्यवर्धन उपक्रमांचे संनियंत्रण

वर्गामधील मूल्यवर्धन उपक्रमांच्या अंमलबजावणीचे सनियंत्रण विद्यमान शालेय यंत्रणांचा सहभाग व प्रचलित कार्यपद्धतींचा वापर करून करता येते. यासाठी तक्ता क्र. २ मध्ये सुचवलेले निर्देशक वापरले जातात. हे निर्देशक अंमलबजावणीच्या तीन अवस्थांनुसार (परिचय अवस्था,रुळण्याची अवस्था, दृढीकरण अवस्था) दिले आहेत, तसेच ते चार प्रमुख विभागांखाली दिलेले आहेत. आवश्यकतेनुसार फाउंडेशनकडून (SMF) नियुक्त केलेल्या निरीक्षक व्यक्तींसाठी साधने व मार्गदर्शन पुरवेल, तसेच काही शाळांमध्ये फाऊंडेशनमधील (SMF) प्रतिनिधीदेखील शाळांमधील मूल्यवर्धन अंमलबजावणीचे निरीक्षण करतील.

**तक्ता २: मूल्यवर्धन अंमलबजावणीचे सनियंत्रण करण्यासाठी टप्प्यानुसार निर्देशक**

| परिचय अवस्था | रुळण्याची अवस्था | दृढीकरण अवस्था |
|---|---|---|
| **मूल्यवर्धनची शाळेतील अंमलबजावणी** | | |
| • सर्व विद्यार्थ्यांना मूल्यवर्धन पुस्तिका मिळाल्या आहेत.<br>• उपक्रम आयोजनासाठी शिक्षकांची नियुक्ती झाली आहे.<br>• साप्ताहिक वेळापत्रकात दोन तासिका राखून ठेवल्या आहेत.<br>• पालक आणि SMC सदस्यांना कार्यक्रमाची माहिती कळवली आहे.<br>• उपक्रमांचे आयोजन नियमितपणे होत आहे. | • मूल्यवर्धनसाठी नियुक्त सर्व शिक्षकांचे प्रशिक्षण झाले आहे.<br>• उपक्रम आयोजनाचा आढावा घेण्यासाठी आणि शिक्षकांच्या अनुभवांची देवाणघेवाण सुकर होण्यासाठी बैठकांचे आयोजन नियमितपणे केले जाते.<br>• मूल्यविषयक यशस्वी अनुभव आणि परिवर्तनाच्या अनुभवांची देवाण–घेवाण केली जाते. | • शिक्षकांना गरजेनुसार उजळणी प्रशिक्षण दिले जाते.<br>• मागणीनुसार शिक्षक व मुख्याध्यापक /प्रभारी प्रमुख यांना एकात्मिक मूल्यशिक्षण पद्धतीविषयी प्रशिक्षण दिले जाते.<br>• इतर शालेय विषयांच्या अध्यापनात मूल्यवर्धन उपक्रमातील अध्ययन अध्यापन पद्धती वापरल्या जातात. |
| **शिक्षकांकडून मूल्यवर्धन वर्गउपक्रमांचे आयोजन** | | |
| • उपक्रम नियोजित क्रमाने व दिलेल्या सूचनांनुसार आयोजित केले जातात. (समर्थनीय बदलांचे अपवाद वगळता)<br>• वर्गात सहयोगी शिक्षणाच्या रचना वापरल्या जातात.<br>• विद्यार्थी मूल्यांकनाचा परिचय झाला आहे. | • शिक्षक शिकवताना बोलणे गरजेपुरतेच मर्यादित ठेवतात.<br>• सहयोगी अध्ययन रचनांचा उचित वापर होतो.<br>• वर्गचर्चा योग्यप्रकारे केल्या/ हाताळल्या जातात.<br>• विद्यार्थी मूल्यांकन विहित पद्धतीनुसार केले जाते. | • मूल्यवर्धन उपक्रम आयोजन पद्धती या विद्यार्थी मूल्यांकन आणि सहभाग यांच्या अनुरोधाने बदलल्या जातात.<br>• उपक्रमांमध्ये योग्य प्रकारे नाविन्य आणले जाते. |
| **वर्ग व्यवस्थापन** | | |
| • शांतता संकेत यथायोग्य रीतीने वापरला जातो.<br>• वर्गनियम आणि ते पाळण्याचे/न पाळण्याचे परिणाम सहभागी रीतीने निश्चित केले जातात. | • वर्गनियम आणि ते पाळण्याचे/न पाळण्याचे परिणाम या विषयीचे पालन योग्य रीतीने केले जाते.<br>• मुलांचे अनुचित वर्तन सकारात्मक रीतीने लक्ष देऊन हाताळले जाते. | • वर्गनियमांचे पालन कशाप्रकारे होते याचे नियमितपणे पुनरावलोकन केले जाते व आवश्यकतेनुसार बदल केला जातो. नियमपालन करण्याच्या/न करण्याच्या परिणामांमध्ये गरजेनुसार बदल केला जातो. |

| विद्यार्थी सहभाग | | |
|---|---|---|
| • विद्यार्थी उपक्रमांत सहभागी होतात.<br>• विद्यार्थी जोडीत/गटांत काम करतात.<br>• विद्यार्थ्यांना वर्गनियमांची जाणीव आहे. | • विद्यार्थी वर्गनियमांचे पालन करतात.<br>• विद्यार्थी जोडीने/गटात सहयोगी अध्ययन करताना अपेक्षित कृती प्रभावीपणे करतात.<br>• विद्यार्थी उपक्रमावरील चर्चेत विचारपूर्वक उत्तरे देतात. | • विद्यार्थी वर्गनियमांचे पालन सातत्याने करतात.<br>• विद्यार्थ्यांच्या प्रतिसादात त्यांच्या चिंतनाचे आणि सर्जनशील विचारांचे प्रतिबिंब दिसते. |

### टीप

मूल्यांकन निर्देशक मुद्रित/ऑनलाइन स्वरुपात शाळा व वर्गनिरीक्षण साधनांमध्ये तपशीलवार दिले आहेत. या साधनांच्या वापरासाठी एक मार्गदर्शक पुस्तिका व अल्पकालीन प्रशिक्षण कार्यक्रम विकसित करण्यात आलेला आहे. गरजेनुसार व संबंधित भागधारकांशी चर्चा करून निर्देशकांत बदल करण्याची मुभा आहे.

## कुटुंब व सामाजिक सहभाग

बहुधा इतर कोणत्याही शालेय क्षेत्राच्या तुलनेत, मूल्यशिक्षणासाठी कुटुंब व स्थानिक समाजाचा अधिक सक्रिय सहभाग आवश्यक असतो. यासाठी शिक्षकांना प्रशिक्षणामध्ये पालक व शालेय व्यवस्थापन समिती सदस्यांना मूल्यवर्धनबाबत माहिती देण्यासाठी आणि मूल्यवर्धन संबंधीच्या घडामोडींसंदर्भात नियमितपणे अद्ययावत ठेवण्यासाठी आवाहन केले जाते. पालक व कुटुंबातील सदस्यांचा सहभाग खात्रीपूर्वक मिळवण्यासाठी मूल्यवर्धन पुस्तिकांमध्ये उपक्रमाच्या अखेरीस घरी करण्यासाठी दिलेल्या कृतींचा खूप उपयोग होतो. याशिवाय शिक्षकांनी विद्यार्थी मूल्यमापनात पालकांचा सहभाग घ्यावा अशीही अपेक्षा आहे.

जेव्हा शाळा मूल्यशिक्षणासाठी एकात्मिक दृष्टिकोन स्वीकारतात, तेव्हा कुटुंब व सामाजिक सहभागासाठी आणखी अनेक संधी उपलब्ध होतात. उदाहरणार्थ संपूर्ण शाळास्तरावरील मूल्यवर्धन उपक्रम (Whole School Activities) व कार्यक्रम हे समाजघटकांच्या सहभागासाठी एक चांगली संधी उपलब्ध करून देतात.

## संभाव्य आव्हाने

मूल्यवर्धनमधून पारंपरिक अध्यापन, मूल्यशिक्षण व विद्यार्थी वर्तनाचे व्यवस्थापन यामध्ये महत्त्वपूर्ण बदल अपेक्षित असतात. असे बदल करताना येऊ शकणारी संभाव्य आव्हाने व त्यावरील उपाययोजना यांचे विवेचन खाली केले आहे :

**मूल्यशिक्षणास प्राधान्य दिले जात नाही**

निर्णय घेणाऱ्या प्रमुख व्यक्ती आणि इतर भागधारकांमध्ये मूल्यशिक्षण हे शालेय शिक्षणाच्या गाभाभूत उद्दिष्टांचा भाग कसे आहे, याविषयी जागरूकता निर्माण केली जाईल. त्यांना, मूल्यवर्धन उपक्रम राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०२३ मधील शैक्षणिक अपेक्षांशी सुसंगत आहेत आणि शाळांसाठी निर्धारित केलेली गुणवत्तापूर्ण शिक्षणाची मानके साध्य करण्यासाठी ते मदतच करतील, हे समजावून सांगितले जाईल.

**शाळेच्या वेळेवरील ओझं**

मूल्यवर्धन हे राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड, २०२३ शी सुसंगत आहे, म्हणजे अभ्यासक्रमाचाच अविभाज्य भाग आहे व त्यामुळे त्यातील उपक्रम साप्ताहिक वेळापत्रकात समाविष्ट करणे सहजशक्य आहे, हे निर्णयघेणाऱ्या प्रमुख व्यक्तींना समजावले जाईल.

**शिक्षक क्षमताविकसन कार्यशाळेसाठी विनाकारण वेळ द्यावा लागतो**

मूल्यवर्धन क्षमताविकास कार्यशाळा या राष्ट्रीय शिक्षण धोरण, २०२० मध्ये सांगितलेल्या शिक्षक क्षमतांच्या गरजांशी सुसंगत आहेत. त्यामुळे या कार्यशाळा विनाकारण लादलेलं 'ओझ' मानता येणार नाहीत. शक्य असल्यास या कार्यशाळा टप्प्याटप्प्याने आयोजित करण्यात येतील. शाळा प्रशिक्षण यंत्रणेशी समन्वय साधून विविध कार्यक्रमांच्या वेळापत्रकांचे एकमेकांवरील अतिक्रमण तसेच प्रशिक्षण आशयाची पुनरावृत्ती इत्यादी गोष्टी टाळता येतील.

**बालकेंद्रित अध्यापनाकडे वाटचाल**

मूल्यवर्धन प्रशिक्षण व उपक्रम हे पारंपरिक अध्यापनशैली बदलण्यासाठी सध्या शासनामार्फत विविध स्तरांवर सुरु असलेल्या प्रयत्नांना पूरकच आहेत.

**मूल्यवर्धनचा कमी–अधिक प्रमाणात स्वीकार**

मूल्यवर्धन मनापासून स्वीकारून अंमलबजावणी करणाऱ्या शाळांचे तसेच शिक्षकांचे प्रमाण वाढवण्यासाठी यशोगाथांची देवाण–घेवाण केली जाईल आणि मूल्यवर्धन स्वीकृतीत अंमलबजावणीत अडथळे असलेल्या शाळांशी वेळोवेळी सल्लामसलत केली जाईल.

**बहुवर्ग आणि बहुभाषिक वर्ग**

मोठ्या शालेय यंत्रणांमध्ये बहुवर्ग अध्यापन कराव्या लागणाऱ्या अनेक शाळा असतात. त्यामुळे त्यातील अध्यापनाविषयी झालेल्या विविध प्रयोगातून आता बहुवर्ग स्थिती हाताळण्यासाठी चांगल्या रीतीने रुळलेल्या पद्धती उपलब्ध आहेत. बहुवर्ग अध्यापनाचे आव्हान भेडसावणाऱ्या शाळांना त्यांचा परिचय करून दिला जाईल. याशिवाय बहुभाषिक शिक्षणाचे आव्हान पेलण्यासाठी याविषयी सिद्ध झालेल्या यशस्वी पद्धती, याविषयी अडचण भासणाऱ्या बहुभाषिक शाळांनी अनुसराव्यात यासाठी मूल्यवर्धन प्रशिक्षणात व प्रशिक्षणानंतर प्रोत्साहन दिले जाईल. हे काम नित्य संपर्कातून आणि संवादातून केले जाईल.

**मूल्यसंघर्ष व नैतिक दुविधा**

जलद गतीने बदलणाऱ्या सध्याच्या जगात मूल्ये अनुसरताना मनात मूल्यसंघर्ष अपरिहार्यच आहे. नैतिक दुविधाही अनिवार्य आहेत आणि लहान मुलांनाही त्यांचा सामना करावा लागू शकतो. प्रशिक्षणात अशा गोष्टींची सविस्तर चर्चा केली जाते. हा संघर्ष हाताळण्यासाठी शाळांना घटनात्मक मूल्ये, चिकित्सक विचार व संवाद यांना प्राधान्य देण्याचे मह तत्त्व पटवून दिले जाते.

# परिभाषा सूची

- **उपक्रम:** विद्यार्थ्यांना इष्ट अध्ययन निष्पत्ती साधण्यासाठी सक्षम करणाऱ्या कृतींची मालिका.
- **मूल्यमापन:** अध्ययन व अध्यापन व कितपत झाले याचे, तसेच अध्ययन अध्यापनाच्या गुणवत्तेचे मोजमाप करण्याची प्रक्रिया.
- **वर्गव्यवस्थापन:** शिक्षक वर्गात विद्यार्थ्यांचे लक्ष अध्ययन केंद्रित राहून ते सजग राहावेत, यासाठी अनुसरत असलेल्या विविध कौशल्यांचा व तंत्रांचा संच. यामुळे मुलांच्या शिकण्यास अडथळा ठरणारे वर्तन किमान राखून ज्यायोगे शिक्षणसुलभ होईल, असे वर्तन कमाल पातळीवर राखले जाते.
- **क्षमता (Competency):** शालेय प्रवासात विशिष्ट टप्प्यांवर प्राप्त केलेल्या क्षमता (abilities), वृत्ती, ज्ञान व कौशल्ये यांचा समूह.
- **सहयोगी अध्ययन:** विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक वृत्तीऐवजी सहयोगाच्या माध्यमातून शिकण्याची प्रक्रिया. अशावेळी मुले परस्परांकडील संसाधने व कौशल्यांचा वापर करतात (एकमेकांशी विचारविनिमय करतात, एकमेकांचे विचार, कल्पना यांचे मूल्यमापन करतात. इत्यादी) आणि शिक्षक केवळ माहिती देणाऱ्याच्या भूमिकेऐवजी मार्गदर्शकाची भूमिका बजावतात.
- **सहयोगी अध्ययन संरचना:** विद्यार्थ्यांमध्ये सहयोगी अध्ययनाच्या तत्त्वानुसार परस्परसंवाद घडवून आणण्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या कार्यपद्धती.
- **ज्ञानरचनावाद:** व्यक्ती अमूर्त संकल्पनांच्या अध्ययनातून न शिकता अनुभवाच्या आधारे ज्ञानाची निर्मिती करतात, या विचारसरणीवर आधारित अध्ययनाचा सिद्धांत.
- **अभ्यासक्रम उद्दिष्टे:** शिक्षणाच्या विविध क्षेत्रांमध्ये विशिष्ट उद्दिष्टे गाठण्यासाठी अभ्यासक्रम रचना व अंमलबजावणीस दिशा देणारी विधाने.
- **अभ्यासक्रम:** शाळांमार्फत पुरवल्या जाणाऱ्या एकूण अध्ययन अनुभवांची गोळाबेरीज. यात अभ्यासक्रमातील विविध पाठ्यक्रमातील मजकूर (अभ्यासयोजना), अध्यापन पद्धती आणि मूल्यशिक्षण आदी संबंधित पैलूंचा समावेश होतो.
- **अभ्यासक्रम आराखडा:** अभ्यासक्रम विकासासाठी मार्गदर्शक तत्त्वे, उद्दिष्टे, रचना व विकसनामागील मूलभूत घटक इत्यादींचा समावेश असलेले अभ्यासक्रम विकसनाचे नियोजन.
- **मूल्यशिक्षणाचा प्रत्यक्ष दृष्टिकोन:** शालेय वेळापत्रकात राखून ठेवलेल्या ठराविक तासांमध्ये मूल्यशिक्षण देण्याची कार्यपद्धती.
- **सर्वांगीण विकास:** एखाद्या मुलाचा सामाजिक, भावनिक, शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकास म्हणजेच मुलाचे सर्वांगीण कल्याण साधणे.
- **मूल्यशिक्षणाचा एकात्मिक (अप्रत्यक्ष) दृष्टिकोन:** वेळापत्रकातील स्वतंत्र तासिकांतून मूल्यशिक्षण न देता शालेय विषयांचे नियमित अध्यापन व शाळेतील इतर उपक्रम व प्रक्रिया यात योग्य ठिकाणी शैक्षणिक अनुभवांमध्ये मूल्यशिक्षण गुंफण्याच्या उपलब्ध संधी वापरून मूल्यशिक्षण देण्याचा दृष्टिकोन.
- **अध्ययन निष्पत्ती:** अध्ययनातून संपादित अशी गोष्ट, की विद्यार्थी संपादनाचा पुरावा इतरांना दखवून देऊ शकतील.

- **बहुवर्ग स्थिती:** ज्या वर्गात वेगवेगळ्या इयत्तांतील विद्यार्थी एकत्र शिकतात, अशी वर्गस्थिती.
- **बहुभाषिक वर्ग:** ज्या वर्गात विद्यार्थी विविध मातृभाषा बोलतात, असा वर्ग. शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची मातृभाषा शाळेच्या अध्यापन भाषेपेक्षा वेगळी असते, असे वर्ग भारतात आढळून येतात. त्यामुळे अशा वर्गांमध्ये बहुभाषिक अध्ययन आणि अध्यापनाची गरज भासते.
- **अध्यापनशास्त्र:** अध्यापन कसे करावे, याविषयी अनुभव आणि शैक्षणिक संशोधनाच्या आधारे निश्चित केलेल्या अध्यापन पद्धती.
- **कार्यपद्धती:** एखादी कृती नेहमी विशिष्ट रीतीने करण्याचा रिवाज नेहमीच्या किंवा सवयीच्या पद्धतीने करणे.
- **मानसिक–सामाजिक वातावरण:** शिकण्याच्या गुणवत्तेवर परिणाम करतात असे शिक्षक–विद्यार्थी, विद्यार्थी–विद्यार्थी संबंध तसेच विद्यार्थी व शाळेतील सामाजिक परिस्थिती यांच्यातील परस्पर मानवी संबंध, यातून तयार झालेले वातावरण.
- **सामाजिक, भावनिक व नैतिक विकास:** म्हणजे असा विकास की ज्यामध्ये मुले भावना समजून घेणे व व्यवस्थापन करणे, सकारात्मक उद्दिष्टे निश्चित करणे व साध्य करणे, सहानुभूतीची भावना विकसित करणे, सकारात्मक नातेसंबंध प्रस्थापित करणे व जबाबदारीने निर्णय घेणे यासाठी आवश्यक ज्ञान, वृत्ती व कौशल्ये आत्मसात करणे.
- **बालकेंद्रित शिक्षण दृष्टिकोन:** यामध्ये विद्यार्थ्याला शिक्षण प्रक्रियेच्या केंद्रस्थानी ठेवले जाते. त्यामुळे विद्यार्थी त्यांच्या शिकण्यात सक्रिय सहभाग घेतात आणि शिकण्यासाठी बाह्यप्रेरणा देण्याची गरज भासत नाही. विद्यार्थ्यात अंतःप्रेरणा निर्माण होते. हा दृष्टिकोन पारंपरिक शिक्षक–केंद्रित दृष्टिकोनाच्या विरुद्ध आहे.
- **मूल्ये:** समाजाकडून इष्ट मानली जाणारी तत्त्वे, मानके किंवा गुणवैशिष्ट्ये.
- **मूल्यशिक्षण:** विद्यार्थ्यांमध्ये विशिष्ट मूल्यांचा विकास करण्यासाठी शाळा पातळीवर करण्यात येणारे प्रयत्न. त्यामुळे त्यांच्या विचार, भावना व वर्तन हे मूल्यांच्या आधारे नियंत्रित होते.
- **संपूर्ण शाळा दृष्टिकोन:** विद्यार्थ्यांसाठी मूल्यशिक्षणासारखी ठरवलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शाळेमधून एकसंधपणे केलेले सहयोगी प्रयत्न.

# परिशिष्ट

## मूल्यवर्धन उपक्रमांमध्ये अंतर्भूत मूल्ये, अभ्यासक्रमाची उद्दिष्टे, क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती

**इयत्ता : पहिली**

| मूल्ये | अभ्यासक्रमाची उद्दिष्टे | क्षमता | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| ● न्याय<br>● स्वातंत्र्य<br>● समता<br>● बंधुता<br>● जबाबदारी<br>● वैज्ञानिक दृष्टिकोन<br>● करुणा<br>● सेवाभाव<br>● राष्ट्रभक्ती<br>● श्रमप्रतिष्ठा | ● निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करणे<br>● स्वतःच्या भावना समजून घेऊन, त्यांचे व्यवस्थापन करण्याची आणि सामाजिक नियमांना सकारात्मक प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित करणे<br>● स्वतःभोवतालच्या नैसर्गिक वातावरणाबद्दल कृतज्ञताभाव दर्शविणे<br>● निरीक्षण व तार्किक विचाराने स्वत: भोवतालच्या जगाची जाणीव करून घेणे<br>● प्रभावी संवादकौशल्ये विकसित करणे<br>● अध्ययनाच्या सवयी विकसित करणे | ● स्व–जाणीव आणि स्व–व्यवस्थापन<br>● जबाबदारीने निर्णय घेणे<br>● सुसंवादी नातेसंबंध<br>● पर्यावरणाची काळजी आणि इतरांच्या कल्याणासाठी योगदान | ● स्वतःच्या आवडी–निवडी सांगतो.<br>● सर्वांना जाणवणाऱ्या सामान्य भावना ओळखतो.<br>● आरोग्य आणि स्वच्छतेच्या मूलभूत सवयी सांगतो.<br>● वर्गात आणि शाळेत पाळायचे नियम सांगतो.<br>● नम्र भाषेत बोलतो.<br>● वनस्पती आणि प्राण्यांची काळजी घेतो. |

**इयत्ता : दुसरी**

| मूल्ये | अभ्यासक्रमाची उद्दिष्टे | क्षमता | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| ● न्याय<br>● स्वातंत्र्य<br>● समता<br>● बंधुता<br>● जबाबदारी<br>● वैज्ञानिक दृष्टीकोन<br>● करुणा<br>● सेवाभाव<br>● राष्ट्रभक्ती<br>● श्रमप्रतिष्ठा | ● निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करणे<br>● स्वतःच्या भावना समजून घेऊन, त्यांचे व्यवस्थापन करण्याची आणि सामाजिक नियमांना सकारात्मक प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित करणे<br>● स्वतःभोवतालच्या नैसर्गिक वातावरणाबद्दल कृतज्ञताभाव दर्शविणे<br>● निरीक्षण व तार्किक विचाराने स्वत: भोवतालच्या जगाची जाणीव करून घेणे<br>● प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करणे<br>● अध्ययनाच्या सवयी विकसित करणे | ● स्व–जाणीव आणि स्व–व्यवस्थापन<br>● जबाबदारीने निर्णय घेणे<br>● सुसंवादी नातेसंबंध<br>● पर्यावरणाची काळजी आणि इतरांच्या कल्याणासाठी योगदान | ● स्वतःच्या क्षमता सांगतो.<br>● वर्तन हे आपल्या भावभावनांशी कशाप्रकारे संबंधित आहेत हे ओळखतो.<br>● आरोग्य आणि स्वच्छतेच्या मूलभूत सवयींचे पालन करतो.<br>● वर्गनियम आणि ते पाळण्याचे/ न पाळण्याचे परिणाम सांगतो.<br>● इतरांचा आदर करतो.<br>● आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्न करतो. |

**इयत्ता : तिसरी**

| मूल्ये | अभ्यासक्रमाची उद्दिष्टे | क्षमता | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| ● न्याय<br>● स्वातंत्र्य<br>● समता<br>● बंधुता<br>● जबाबदारी<br>● वैज्ञानिक दृष्टिकोन<br>● करुणा<br>● सेवाभाव<br>● राष्ट्रभक्ती<br>● श्रमप्रतिष्ठा | ● मौखिक भाषाकौशल्यांचा विकास करणे<br>● विविध परिस्थितीमध्ये स्वतःची आणि इतरांची सुरक्षितता कशी जपावी याचे वर्णन करणे<br>● सामाजिक आणि नैसर्गिक परिसराबाबात संवेदनशीलता विकसित करणे<br>● त्यांच्याप्रती आणि इतरांप्रती असलेल्या त्यांच्या व्यक्तिगत आणि सामाजिक वर्तनाबद्दल संवेदनशीलता निर्माण करणे<br>● स्वयंमूल्यमापन आणि स्वतःची प्रगती करण्याच्या गरजेविषयी समज निर्माण करणे | ● स्व–जाणीव आणि स्व–व्यवस्थापन<br>● जबाबदारीने निर्णय घेणे<br>● सुसंवादी नातेसंबंध<br>● पर्यावरणाची काळजी आणि इतरांच्या कल्याणासाठी योगदान | ● स्वतःच्या क्षमता आणि गुणांचे स्वतःला स्वारस्य असणाऱ्या बाबी यांचे वर्णन करतो.<br>● मनातील तीव्र भावना योग्य प्रकारे व्यक्त करतो.<br>● घरी करावयाची कामे सांगतो.<br>● नियमांचे महत्त्व ओळखतो.<br>● मित्रांना मदत करतो.<br>● शाळेतील आणि सार्वजनिक ठिकाणाच्या सुविधा योग्यप्रकारे वापरतो. |

**इयत्ता : चौथी**

| मूल्ये | अभ्यासक्रमाची उद्दिष्टे | क्षमता | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| ● न्याय<br>● स्वातंत्र्य<br>● समता<br>● बंधुता<br>● जबाबदारी<br>● वैज्ञानिक दृष्टीकोन<br>● करुणा<br>● सेवाभाव<br>● राष्ट्रभक्ती<br>● श्रमप्रतिष्ठा | ● मौखिक भाषाकौशल्यांचा विकास करणे<br>● विविध परिस्थितीमध्ये स्वतःची आणि इतरांची सुरक्षितता कशी जपावी याचे वर्णन करणे<br>● सामाजिक आणि नैसर्गिक परिसराबाबत संवेदनशीलता विकसित करणे<br>● त्यांच्याप्रती आणि इतरांप्रती असलेल्या त्यांच्या व्यक्तिगत आणि सामाजिक वर्तनाबद्दल संवेदनशीलता निर्माण करणे<br>● स्वयंमूल्यमापन आणि स्वतःची प्रगती करण्याच्या गरजेविषयी समज निर्माण करणे | ● स्व–जाणीव आणि स्व–व्यवस्थापन<br>● जबाबदारीने निर्णय घेणे<br>● सुसंवादी नातेसंबंध<br>● पर्यावरणाची काळजी आणि इतरांच्या कल्याणासाठी योगदान | ● स्वतःची बलस्थाने आणि कमतरता सांगतो.<br>● इतरांच्या भावना आणि दृष्टिकोन ओळखतो.<br>● शाळेत सांगितलेली आणि घरची कामे वेळेवर पूर्ण करण्यासाठी नियोजन करतो.<br>● वर्ग आणि शाळेच्या नियमांचे सातत्याने पालन करतो.<br>● प्रामाणिकपणाचे महत्त्व ओळखतो.<br>● गटांमध्ये इतरांसोबत चांगल्याप्रकारे काम करतो<br>● पर्यावरणाबद्दल काळजी दर्शवतो.<br>● समाजातील विविध क्षेत्रांतील लोकांच्या योगदानाचे वर्णन करतो. |

**इयत्ता : पाचवी**

| मूल्ये | अभ्यासक्रमाची उद्दिष्टे | क्षमता | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| • न्याय<br>• स्वातंत्र्य<br>• समता<br>• बंधुता<br>• जबाबदारी<br>• वैज्ञानिक दृष्टीकोन<br>• करुणा<br>• सेवाभाव<br>• राष्ट्रभक्ती<br>• श्रमप्रतिष्ठा | • मौखिक भाषाकौशल्यांचा विकास करणे<br>• विविध परिस्थितीमध्ये स्वतःची आणि इतरांची सुरक्षितता कशी जपावी याचे वर्णन करणे<br>• सामाजिक आणि नैसर्गिक परिसराबाबात संवेदनशीलता विकसित करणे<br>• त्यांच्याप्रती आणि इतरांप्रती असलेल्या त्यांच्या वैयक्तिक व्यक्तिगत आणि सामाजिक वर्तनाबद्दल संवेदनशीलता निर्माण करणे<br>• स्वयंमूल्यमापन आणि स्वतः ची प्रगती करण्याच्या गरजेविषयी समज निर्माण करणे | • स्व–जाणीव आणि स्व–व्यवस्थापन<br>• जबाबदारीने निर्णय घेणे<br>• सुसंवादी नातेसंबंध<br>• पर्यावरणाची काळजी आणि इतरांच्या कल्याणासाठी योगदान | • स्वतःच्या क्षमता व्यक्तीगत कौशल्ये, छंद, आणि स्वारस्य असणाऱ्या बाबी जोपासण्याचा प्रयत्न करतो.<br>• ताण हातळण्याच्या सकारात्मक मार्गांचे वर्णन करतो.<br>• शाळेची आणि घरची कामे वेळेवर करतो.<br>• नियम तयार करण्याच्या कारणांचे विश्लेषण करतो.<br>• वर्तनाचे हेतू आणि परिणामांचे विश्लेषण करतो.<br>• वर्गमित्रांमधील मतभेद सकारात्मक मार्गांनी सोडवतो<br>• पर्यावरण रक्षणासाठी योग्य ती पावले उचलतो.<br>• महिलांचे विविध प्रकारचे योगदान ओळखतो. |

**इयत्ता : सहावी**

| मूल्ये | अभ्यासक्रमाची उद्दिष्टे | क्षमता | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| • न्याय<br>• स्वातंत्र्य<br>• समता<br>• बंधुता<br>• जबाबदारी<br>• वैज्ञानिक दृष्टीकोन<br>• करुणा<br>• सेवाभाव<br>• राष्ट्रभक्ती<br>• श्रमप्रतिष्ठा | • प्रभावी संवाद साधण्याच्या क्षमतेचा विकास करणे<br>• सुदृढ, निरोगी व निरामय, सुदृढ आणि हितकारक जीवनाच्या घटकांचे महत्त्व समजून घेणे<br>• त्यांच्याप्रती आणि इतरांप्रती असलेल्या त्यांच्या वैयक्तिक व्यक्तिगत आणि सामाजिक वर्तनाबद्दल संवेदनशीलता निर्माण करणे<br>• शारीरिक कृती, आरोग्य, आनंद, आव्हाने, भावभावना आणि सामाजिक आंतरक्रिया यातील संबंध समजून घेणे | • स्व–जाणीव आणि स्व–व्यवस्थापन<br>• जबाबदारीने निर्णय घेणे<br>• सुसंवादी नातेसंबंध<br>• पर्यावरणाची काळजी आणि इतरांच्या कल्याणासाठी योगदान | • शैक्षणिक कामगिरी सुधारण्यासाठी नियोजन करतो.<br>• ताण सकारात्मक रीतीने हाताळतो.<br>• नियमांचे पालन कितपत चांगल्या रीतीने केले जात आहे याचे विश्लेषण करतो<br>• नैतिक तत्त्वे ओळखतो. (उदा. प्रमाणिकपणा आणि न्याय)<br>• गटातील काम निश्चितपणे परिणामकारक होण्याच्या दृष्टीने सहकार्यवृत्ती दर्शवतो<br>• पाणी आणि इतर संसाधनांचा योग्य वापर यासाठी पावले उचलतो.<br>• आजूबाजूच्या परिसरातील लोकांना भेडसावणाऱ्या सर्वसामान्य समस्यांचे वर्णन करतो. |

**इयत्ता : सातवी**

| मूल्ये | अभ्यासक्रमाची उद्दिष्टे | क्षमता | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| ● न्याय<br>● स्वातंत्र्य<br>● समता<br>● बंधुता<br>● जबाबदारी<br>● वैज्ञानिक दृष्टीकोन<br>● करुणा<br>● सेवाभाव<br>● राष्ट्रभक्ती<br>● श्रमप्रतिष्ठा | ● प्रभावी संवाद साधण्याच्या क्षमतेचा विकास करणे<br>● सुदृढ, निरोगी निरामय, सुदृढ आणि हितकारक जीवनाच्या घटकांचे महत्त्व समजून घेणे<br>● त्यांच्याप्रती आणि इतरांप्रती असलेल्या त्यांच्या व्यक्तिगत आणि सामाजिक वर्तनाबद्दल संवेदनशीलता निर्माण करणे<br>● कुटुंबात प्रचलित असलेल्या बाबींपासून ते समुदाय/प्रादेशिक/राष्ट्रीय स्तरावर समाजात असणारी विविध प्रकारची असमानता, पूर्वग्रह हे समजून घेणे आणि या समस्यांचे निराकरण करण्यासाठी पुढाकार घेणे<br>● शारीरिक कृती, आरोग्य, आनंद, आव्हाने, भावभावना आणि सामाजिक आंतरक्रिया यातील संबंध समजून घेणे | ● स्व–जाणीव आणि स्व–व्यवस्थापन<br>● जबाबदारीने निर्णय घेणे<br>● सुसंवादी नातेसंबंध<br>● पर्यावरणाची काळजी आणि इतरांच्या कल्याणासाठी योगदान | ● अभ्यासाच्या क्षमता आणि सवयी विकसित करतो.<br>● स्वतःमध्ये होणारे शारीरिक आणि मानसिक बदल यांचे वर्णन करतो<br>● कायद्यांचे महत्त्व ओळखतो.<br>● नैतिक तत्त्वांचे महत्त्व ओळखतो. (उदा प्रामाणिकपणा आणि न्याय)<br>● स्वतःवर समवयस्कांचा पडणारा प्रभाव ओळखतो.<br>● शाळेत आणि आजूबाजूच्या परिसरातील सर्वसामान्य समस्या सोडवण्याच्या प्रयत्नात सहभागी होतो.<br>● समाजात असणारी विविध प्रकारची असमानता आणि पूर्वग्रह यांचे वर्णन करतो. |

**इयत्ता : आठवी**

| मूल्ये | अभ्यासक्रमाची उद्दिष्टे | क्षमता | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| ● न्याय<br>● स्वातंत्र्य<br>● समता<br>● बंधुता<br>● जबाबदारी<br>● वैज्ञानिक दृष्टीकोन<br>● करुणा<br>● सेवाभाव<br>● राष्ट्रभक्ती<br>● श्रमप्रतिष्ठा | ● प्रभावी संवादाची कौशल्ये विकसित करतो<br>● सुदृढ, निरोगी व निरामय आरोग्याच्या घटकांचे महत्त्व समजून घेणे<br>● त्यांच्याप्रती आणि इतरांप्रती असलेल्या त्यांच्या व्यक्तिगत आणि सामाजिक वर्तनाबद्दल संवेदनशीलता निर्माण करणे<br>● कुटुंबात प्रचलित असलेल्या बाबींपासून ते समुदाय/प्रादेशिक/राष्ट्रीय स्तरावर समाजात असणारी विविध प्रकारची असमानता, पूर्वग्रह हे समजून घेणे आणि त्यावर उपाययोजना करण्यासाठी पुढाकार घेणे<br>● भारतीय समाजात लोकशाही मूल्ये रुजवण्यातील संविधानाचे महत्त्व जाणणे | ● स्व–जाणीव आणि स्व–व्यवस्थापन<br>● जबाबदारीने निर्णय घेणे<br>● सुसंवादी नातेसंबंध<br>● पर्यावरणाची काळजी आणि इतरांच्या कल्याणासाठी योगदान | ● स्वतःमध्ये सुधारणा करण्यासाठी ध्येये ठरवतो.<br>● स्वतःच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याची काळजी घेतो.<br>● सर्व नागरिकांचे हक्क आणि कर्तव्ये ओळखतो<br>● नैतिक तत्वांच्या आधारे वर्तनाचे मूल्यांकन करतो.<br>● समवयस्कांचा हानिकारक प्रभाव टाळण्यासाठी उपाययोजना करतो.<br>● समाजसेवा कार्यात भाग घेतो.<br>● समाजात असणारी विविध स्वरूपाची समानता आणि पूर्वग्रह यांचे विश्लेषण करतो. |

**संदर्भ:**

राज्य अभ्यासक्रम आराखडा – पायाभूत स्तर (२०२४),

राज्य अभ्यासक्रम आराखडा – शालेय शिक्षण (२०२४)

मूल्यवर्धन संकल्पनात्मक आराखडा २०२५

# शांतिलाल मुथ्था फाउंडेशन

मुथ्था चेम्बर्स 2, लेवल 8, सेनापती बापट रोड, पुणे, महाराष्ट्र 411 016
info@mutthafoundation.org
+91 20 6605 0000/ +91 20 6605 0191
www.mutthafoundation.org